अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. ९ जुलै २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २८० वा किंमत : ५ रुपये | पाने ८

महसूलमंत्री राधाकृष्ण विखे आढळराव पाटलांच्या भेटीला

शिरूर : राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बंडखोरी केल्यानंतर अजित पवार आठ आमदारांसह शिंदे फडणवीस सरकारमध्ये सहभागी झाले. यानंतर राज्यातील सत्तासमीकरणं बदलली आहेत. यानंतर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. याचदरम्यान, भाजप नेते व महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे यांनी अचानकपणे शिवसेनेचे उपनेते माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांची भेट घेतली. राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे राज्यातील राजकीय भूकंपानंतर पहिल्यांदाच शनिवारी अचानकपणे शिवसेनेचे उपनेते माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या भेटीला आले. दोन्ही नेत्यांमध्ये बराचवेळ चर्चा झाली. मात्र, या भेटीत नेमकं काय झालं हे सध्या गुलदस्त्यात असून उलटसुलट चर्चांना उधाण आलं आहे. वळसे पाटील रविवारी मंचरला येणार आहे. त्यांचेही आपण स्वागत करणार असल्याचे आढळराव पाटील यांनी यापूर्वी सांगितले आहे. या दोन जुन्या मित्रांची मैत्री पुन्हा बहरणार अशीच तालुक्यात चर्चा आहे.

सभापती 'ॲक्शन मोड'वर 'बंडोबां'वर टांगती तलवार

शिवसेनेच्या सर्वच आमदारांना धाडल्या नोटिसा

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

राज्यातील शिंदे-ठाकरे गटातील सत्तेचा संघर्ष टर्निंग पॉईंटवर येण्याची चिन्हे दिसत आहेत. विधानसभेचे सभापती राहुल नार्वेकर हे अपात्र आमदारांच्या प्रकरणावर ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाच्या ४० व उद्धव ठाकरे गटाच्या सर्व आमदारांना नोटिसा धाडल्या असून या प्रकरणी सात दिवसांच्या उत्तर देण्याचे फर्मान त्यांनी सोडल्याचे वृत्त आहे. नार्वेकर यांनी हा 'दंडुका' उगारताच शिंदे गटातील शिंदे यांच्यासह सोळा आमदारांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजित पवार हे सरकारच्या आश्रयाला गेल्यानंतर नार्वेकरांनी लागलीच हे पाऊल उचलावेत हा एक योगायोग मानला जात आहे.दरम्यान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिंदे यांना राजीनामा देण्याचा सल्ला दिल्याचा गौप्यस्फोट ठाकरे गटाचे युवा नेते आदित्य ठाकरे यांनी केल्यामुळे राज्याचे लक्ष या घडामोडींकडे वेधले आहे.

शिंदे गट आणि ठाकरे गट यांच्यातील सत्तासंघर्षावर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालावर शिंदे गटातील 'त्या' सोळा आमदारांच्या अपात्रतेवर नार्वेकर यांना निर्णय घ्यावा लागणार आहे,अशी सूचना केली होती.

विधानसभेचे पावसाळी अधिवेशन १७ जुलैपासून सुरू होणार आहे. त्यातच अपात्रतेवर दोन आठवड्याच्या आत निर्णय घेण्याची सूचना व्हावी म्हणून ठाकरे गटाने कोर्टात धाव घेतली आहे. या साऱ्या पार्श्वभूमीवर नार्वेकर यांनी निर्णय घेण्याची कार्यवाही सुरू केली आहे.

निवडणूक आयोगाने शिवसेनेच्या घटनेची प्रत विधानसभा अध्यक्षांना पाठवल्यानंतर नार्वेकर ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. शिवसेना(शिंदे गट) आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या आमदारांच्या अपात्रतेविषयी नार्वेकरांकडून नोटीस जारी करण्यात आली आहे.

दोन्ही पक्षांच्या आमदारांना त्यांचे म्हणणं मांडण्यासाठी सात दिवसांची मुदत देण्यात आली आहे. नार्वेकर यांनी शिवसेनेच्या ४० आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या १४ आमदारांना ही नोटीस जारी केली आहे. एनआयएकडून या विषयीचे वृत्त दिले गेले आहे.

आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय घेण्याची जबाबदारी कोर्टाने विधानसभा अध्यक्षांवर सोपवली आहे.

आपण शिवसेनेच्या घटनेचा अभ्यास करुन यावर निर्णय घेऊ, असे नार्वेकर यांनी म्हटले होते. त्यानुसार नार्वेकर यांनी नोटीस पाठवली आहे. यावेळी आमदारांना पुराव्यांसह प्रतिज्ञापत्र सादर करावे लागणार आहे.

राजीनामा देण्याचा सल्ला

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात मुंबईतील वर्षा निवासस्थानी शुक्रवारी बैठक झाली. ती उशिरापर्यंत चालली. शुक्रवारी रात्री उशिरा झालेल्या बैठकीनंतर फडणवीस रवाना झाले. शनिवारी ठाकरे गटाचे युवा नेते आदित्य ठाकरे यांनी मोठा गौप्यस्फोट केला. या बैठकीत फडणवीस यांनी शिंदे यांना राजीनामा देण्यास सांगितले आहे. त्यामुळे सरकारमध्ये काही बदल होऊ शकतात,असे आदित्य यांनी सांगितले.

बावनकुळेंना खंडन

येत्या काही दिवसांत राज्याला नवा मुख्यमंत्री मिळण्याची शक्यता धुडकावून लावली. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की- विरोधी पक्ष जाणीवपूर्वक गोंधळ घालत असून पुढील निवडणुकांपर्यंत एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री राहतील.

कोण हे सोळजण...

या १६ आमदारांमध्ये एकनाथ शिंदेंसह अनिल बाबर यांचा समावेश आहे. एकनाथ शिंदे राज्याचे मुख्यमंत्री असून अनिल बाबर सांगली जिल्ह्यातील खानापूर विधानसभेत शिवसेनेच्या तिकिटावर निवडून आले होते. प्रकाश सुर्वे ठाण्यातील मागाठाणे विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत. महेश शिंदे गोरेगावचे आमदार आहेत.

भरत गोगावले यांनाही नोटीस पाठवली जाण्याची शक्यता आहे. संजय शिरसाट हेदेखील १६ आमदारांमध्ये असून ते औरंगाबाद विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत.

तानाजी सावंत भूम परांडा मतदार संघातील आमदार असून आरोग्यमंत्री आहेत. संदीपान भुमरे पैठण मतदारसंघाचे १९९५ पासून ५ वेळा आमदार झाले आहेत.

पवारांची साथ सोडून आ. मकरंद पाटील दादा गटात

सुराज्य/सातारा

राष्ट्रवादीच्या फुटीनंतर शरद पवारांच्या गाडीतून प्रवास करणारे वाईचे आमदार मकरंद पाटील यांनी कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव शनिवारी मुंबईत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेतला.

वाई, महाबळेश्वर, खंडाळा तालुक्यातील राष्ट्रवादीच्या सुमारे अडीचशे कार्यकर्त्यांसह मकरंद पाटील यांनी आज देवगिरी बंगल्यावर जाऊन निर्णय जाहीर केला. राष्ट्रवादीत दोन गट पडल्यानंतर साहेब की दादा अशी सर्वांचीच मनस्थिती झाली होती. मकरंद पाटील यांचे नाव अजित पवारांच्या यादीत होते. तेच त्यांचे नाव मंत्रीपदाच्या यादीतही होते. पण, शरद पवार यांच्याशी पाटील घराण्याशी असलेली भावनिक जवळीकीमुळे मकरंद पाटील यांनी कार्यकर्त्यांशी चर्चा करुनच निर्णय घेतो, असे अजित दादांना सांगितले होते. त्यामुळे ते काय निर्णय घेणार याची उत्सुकता जिल्ह्यात होती. पण त्यानंतर वाई, खंडाळा, महाबळेश्वर तालुक्यातील कार्यकर्त्यांशी चर्चा केल्यानंतर सर्वांनीच किसन वीर कारखान्याच्या सभासदांच्या हितासाठी मकरंद पाटलांनी अजित पवारांसोबत जावे, असा सूर निघाला. त्यामुळे मकरंद पाटील द्विधामनस्थितीत होते. शनिवारी दुपारीच वाई, खंडाळा, महाबळेश्वर तालुक्यातील सुमारे दोनशे ते अडीचशे कार्यकर्त्यांसह मकरंद पाटील हे अजित पवार यांच्या देवगिरी बंगल्यावर दाखल झाले. त्यांनी दादांसोबत असल्याचे जाहीर केले. यावेळी सर्वांचे स्वागत करण्यात आले.

वाहनाच्या धडकेने पादचारी ठार

सोलापूर : वेगाने जाणाऱ्या पेट्रोलिंग करणाऱ्या वाहनाच्या धडकेने पादचारी इसम गंभीर जखमी होऊन मरण पावले. हा अपघात मंगळवेढा रोडवरील रिलायन्स मार्केट जवळ शनिवारी पहाटेच्या सुमारास घडला.महंमद रफीक अब्दुल बागवान (वय ५०रा . थोबडेवस्ती, देगाव) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. ते आज पहाटे पाच वाजेच्या सुमारास घरातून नमाज पठण करण्यासाठी बाहेर निघाले होते. त्यावेळी मंगळवेढाच्या दिशेने जाणाऱ्या पेट्रोलिंगच्या चारचाकी वाहनाच्या धडकेने ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारा दरम्यान मयत झाले. या अपघाताची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली आहे.

वल्याळ, गोप यांचा शेकडो समर्थकांसह बीआरएसमध्ये प्रवेश

शहरात आयटी पार्क करण्याचे केसीआर यांचे आश्वासन

सुराज्य/सोलापूर

सोलापूर सारखे मोठे शहर विकासापासून वंचित आहे. येथे शिकलेल्या मुलांना रोजगारासाठी परगावी जावे लागते. हे विदारक चित्र दूर करण्यासाठी बीआरएसच्या हाती सत्ता द्या. आम्ही शहराचा विकास तर करूच शिवाय मोठे मोठे आयटी कंपन्याही आण्याचे आश्वासन बीआरएसचे सर्वेसर्वा तथा तेलंगणाचे मुख्यमंत्री के.चंद्रशेखर राव यांनी शनिवारी हैदराबाद येथे सोलापूरातील नेत्यांना दिले.

हैदराबाद येथील भारत राष्ट्र समितीच्या मुख्यालयात पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप,भाजपचे माजी नगरसेवक नागेश वल्याळ यांच्यासह संतोष भोसले,जुगून अंबेवाले आणि राजश्री चव्हाण या भाजपच्या माजी नगरसेवकांनी केसीआर यांच्या प्रमुख उपस्थितीत बीआरएस पक्षात प्रवेश केला. स्वातंत्र्याला ७५ वर्षे उलटूनही देशाचा म्हणावा तसा विकास झाला नाही. शेतकऱ्यांची अवस्था दयनीय आहे. लोकांना पाणी आणि वीज यासारख्या मूलभूत सुविधा मिळत नाहीत. महाराष्ट्र राज्यात आतापर्यंत काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना आणि भाजपला जनतेने संधी दिली, तरीदेखील या राज्यातील प्रश्न सुटलेले नाहीत.

देशात आता क्रांती,परिवर्तनाची गरज आहे,परिवर्तित भारतच समस्यांचे उच्चाटन करू शकतो. बीआरएस हा क्रांती आणणारा पक्ष आहे. बीआरएस पक्षाचा देशभरात विस्तार करून शेतकऱ्यांची सत्ता देशावर आणण्याचा आमचा संकल्प आहे. असल्याचे यावेळी मार्गदर्शन करताना केसीआर म्हणाले. जुलै अखेर सोलापूरात येण्याचे अश्वासन यावेळी केसीआर यांनी यावेळी दिले.

सोलापूरचा आजवर सत्ताधाऱ्यांनी विकास केला नाही. त्यामुळे आता तेलंगणा पॅटर्नची सोलापूरला नितांत गरज आहे. सोलापूरचा विकास करण्याच्या उद्देशाने मी व गोप यांनी बीआरएसमध्ये प्रवेश केला. उच्च शिक्षित तरुण रोजगाराच्या शोधात पुणे, मुंबई,बेंगळुरू, हैदराबादला जातात. त्यांच्यासाठी सोलापूरात आयटी कंपनी आणणे बीआरएसकडून अपेक्षित असल्याचे मत नागेश वल्याळ यांनी यावेळी व्यक्त केले.

बीआरएस प्रवेश करण्यासाठी जाताना नागेश वल्याळ आणि दशरथ गोप यांनी मोठे शक्ती प्रदर्शन केले पाचशे कार्यकर्ते आणि शंभर चार चाकी गाड्याचा लवाजमा घेऊन मोठे शक्ती प्रदर्शन केले.

घोडातांडा हातभट्ट्यांवर धाड; महिलेसह ७ जणांवर गुन्हे

अडीच लाखांचा माल जप्त

सुराज्य/सोलापूर

राज्य उत्पादन शुल्कच्या पथकाने शनिवारी घोडा तांडा व भोजप्पा तांडा (उत्तर सोलापुर) या ठिकाणी हातभट्टचांवर धाडी टाकून ५ महिला आणि २ पुरुष अशा ७ जणांवर गुन्हे नोंदवून २ लाख ५० हजाराचा माल जप्त केला.

शनिवारी घोडा तांडा या ठिकाणी शोभु भोजू जाधव (वय ५७), जनाबाई रामू पवार (वय ४४), मथुराबाई भिमा चव्हाण (वय ५४), भारत वालू राठोड (वय ३३) यांच्या हातभट्टी केंद्रावर छापे टाकून गुळमिश्रित रसायन व हातभट्टी दारू जप्त केली.

तसेच भोजप्पा तांडा येथे बेबाबाई पांडुरंग चव्हाण (वय ५२), सुमन गुरुनाथ राठोड (वय ४७) आणि अश्विनी थावरू राठोड (वय २२) यांच्या ताब्यातून गुळमिश्रित रसायन व हातभट्टी दारू जप्त केली.या मोहिमेत राज्य उत्पादनच्या पथकाने ७ गुन्हे दाखल करून रसायन आणि हातभट्टी असा एकूण २ लाख ५२ हजाराचा माल जप्त केला.

सर्व आरोपींविरुद्ध दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आले. ही कारवाई राज्य उत्पादनचे प्रभारी उप अधीक्षक सदानंद मरकरे, निरीक्षक राहुल बांगर, निरीक्षक उषाकिरण मिसाळ, सुरेश झगडे, अक्षय भरते, रोहिणी गुरव, मानसी वाघ,कृष्णा सुळे, सचिन गुठे, दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, गजानन होळकर, जवान शोएब बेगमपुरे, किरण खंदारे, चेतन व्हनगुंटी, अशोक माळी, अण्णा कर्चे, अनिल पांढरे, इस्माईल गोडीकट, प्रशांत इंगोले, वसंत राठोड, योगीराज तोग्गी, वाहनचालक रशिद शेख यांनी केली.

निसरा डोळा

– प्रकाश पोरे

'देवालाच माहित' हे वाक्य बदलायला हवे!

कल्याण
567-80-460

घटनात्मक संस्था या मोदी, शहा यांच्या गुलाम

पंढरपुरात खा.राऊत यांची टीका

सुराज्य/पंढरपूर

सध्याच्या राजकीय घडामोडीवर तीव्र नाराजी व्यक्त करीत घटनात्मक संस्था या मोदी, शहा यांच्या गुलाम आहेत. तर आगामी विधानसभा निवडणुकींत येवल्यात आम्ही छगन भुजबळ यांचा पराभव करु तिथे शिवसेनेचा आमदार असेल, असे शिवसेना ठाकरे गटाचे खा. संजय राऊत म्हणाले. ते शनिवारी पंढरपूर येथे सहकुटुंब विठ्ठल दर्शनासाठी आले होते.

यावेळी त्यांनी येथील सिंहगड कॉलेज पत्रकार परिषदेत घेऊन पक्षाची भूमिका मांडत केंद्र व राज्य सरकारवर टीका केली.

पुढे ते म्हणाले की, आम्ही अनेकांना वैधानिक पदे दिली. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा केले, पाच वेळा आमदारकी, विधान परिषदेत सभापती म्हणून पाठविले, हवे ते दिले, आज तिच माणसे पक्ष सोडून जात असतील तर लाज वाटते. शरद पवार यांच्या राजकारणामुळे आज अजित पवार दिसत आहेत. त्यांना एवढी मोठी मजल मारता आली.पण कितीही संकट आली, तरी शरद पवार, उध्दव ठाकरे हे राजकीय संकटांची पर्वा करीत नाहीत. ते माघार घेणार नाहीत,असेही त्यांनी सांगितले. भुजबळ यांनी पुन्हा आमच्याशी गद्दारी केली आहे. पूर्वी नाशिकमध्ये आम्ही त्यांचा पराभव केला होता, आता येवल्यात पाडू.

कोण? कशाकरीता पक्ष सोडून गेले ते सर्वांना माहीत आहे. पक्षाने यांना किती द्यायचे? अजित पवार यांच्या आमदारांना भाजपच्या तंबूत जाऊन मंत्रिपदे मिळविणे तेवढे सोपे नाही.

निवडणूक आयोगाने दिलेल्या निकालावर विश्वास नाही, आता सर्वोच्च न्यायालयावर भरोसा राहिला असल्याचे राऊत शेवटी म्हणाले. यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख संभाजी शिंदे आदी मान्यवर मंडळी उपस्थित होते.

'ती' शरद पवारांची खेळी नाही

मी पक्षासाठी तुरुंगात गेलो. पण गद्दारी केली नाही पण बांडगुळ गेली ते बरेच झाले, अजित पवार तिकडे गेले, यात शरद पवार यांची कोणतीही खेळी नाही, चार वेळा उपमुख्यमंत्री, सात वेळा आमदार करूनही ते गेले असे राऊत म्हणाले.

पंगतीत प्रसाद वाढत सेवा बजावली

शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत सहकुटुंब विठ्ठल दर्शनासाठी पंढरपूर येथे आले असता, संजय राऊत यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात जाऊन दर्शन घेतले तसेच तुकाराम भवन येथील अन्नछत्रात जाऊन त्यांनी पंगतीत प्रसाद वाढून सेवा बजावली व प्रासादिक भोजनाचा आस्वाद घेतला.

निवडणुका जिंकण्याच्या दृष्टीने तयारीला लागा : चेतन नरोटे

सुराज्य/सोलापूर

निवडणुका जिंकण्यासाठी बूथ कमिटया स्थापन करणे खुप महत्वाचे आहे. काँग्रेस पक्षाचे कार्य, सत्ताधाऱ्यांचे जनताविरोधी धोरण जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी, निवडणुकींत जनतेपर्यंत प्रत्यक्ष पोहोचण्यासाठी, बूथ लेवल कार्यकर्ता हा महत्वाचा आहे. बूथ पातळीवर कार्य चांगले असेल तरच आपण निवडणूक जिंकु शकतो. त्यासाठी आतापासून कामाला लागा, असे प्रतिपादन काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी केले.

बूथ कमिटया स्थापन करून पक्ष संघटना मजबूत करण्यासंदर्भात आयोजित शहर काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकींत नरोटे बोलत होते. ते म्हणाले की, जनता केंद्रातील आणि राज्यातील खोके सरकारच्या जनताविरोधी कार्यपध्दतीवर नाराज आहेत. चारच दिवसापूर्वी मोदी यांनी ज्या पक्षावर भ्रष्टाचाराचे आरोप केले त्यांना पावन करून सत्तेत सहभागी करून घेतले हे लोकांना रुचलेले नाही. काँग्रेस पक्षावर लोकांचा विश्वास वाढत आहे. अनेक जण काँग्रेसमध्ये येण्यास इच्छुक आहेत.

निवडणुका कधीही लागू शकतात आरपारची लढाई आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनता गोरगरीब केंद्रबिंदु मानुन काम करा. आगामी महानगरपालिका, लोकसभा, विधानसभा निवडणुका जिंकण्यासाठी, लोकशाही, संविधान वाचविण्यासाठी प्रत्येक प्रभाग आणि वार्ड मध्ये बूथ कमिटया स्थापन करून पक्ष मजबूत करण्याचे काम पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या सहकार्याने करणार आहे.

यावेळी कार्याध्यक्ष संजय हेमगड्डी, प्रवक्ते अशोक निंबर्गी, महिला अध्यक्षा प्रमिला तुपलवंडे, मा. नगरसेवक शिवा बाटलीवाला, प्रवीण निकाळजे, हाजी तौफ़ीक़ हत्तूरे, विनोद भोसले, नरसिंग कोळी, दत्तू बंदपट्टे, रफीक इनामदार, फिरदौस पटेल, प्रदेश चिटणीस किसन मेकाले, हेमाताई चिंचोळकर, वरिष्ठ उपाध्यक्ष सुनील रसाळे, ब्लॉक अध्यक्ष देवीदास गायकवाड, उदयशंकर चाकोते, बाबूराव म्हेत्रे, सेवादल अध्यक्ष भीमाशंकर टेकाळ अरुणा भालेराव, कोंडनताई काकड़े यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

सोलापुरात १४ जुलैपासून हृदयरोग, ईसीजी राष्ट्रीय परिषद

सुराज्य/सोलापूर

कार्डियॉलॉजी सोसायटी सोलापूर आणि असोसिएशन ऑफ फिजिशिअन्स ऑफ इंडिया सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या दि. १४ ते १६ जुलै २०२३ दरम्यान हॉटेल बालाजी सरोवरमध्ये हृदयरोग इलेक्ट्रोकार्डियोग्रा राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती संयोजक व ज्येष्ठ हृदयरोगतज्ञ डॉ. गुरुनाथ परळे यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रथमच सोलापूरमध्ये वैद्यकीय शाखेची राष्ट्रीय पातळीवरची परिषद होणार आहे. या परिषदेसाठी खास अमेरिकेतील मेयो क्लिनिकचे प्रसिध्द हृदयरोगतज्ञ डॉ. सॅम्युएल आसीर्वाथम् व भारताच्या चारही विभागांतून अनेक ज्येष्ठ हृदयरोगतज्ञ उपस्थित फिजिशिअन्स व कार्डिऑलॉजिस्टना मार्गदर्शन करणार आहेत. या परिषदेत सुमारे पन्नास मार्गदर्शनपर व्याख्याने, चर्चासत्रे होतील. तसेच शिकाऊ एम.डी. मेडिसीन व डीएम (कार्डियोलॉजी) विद्यार्थ्यांकरिता वेगवेगळी वर्कशॉप्स, शोध निबंध सादरीकरण तसेच क्विझ कॉंपिटीशन्स आयोजित करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे या परिषदेच्या निमित्ताने सामाजिक जनजागृतीकरिता हार्टॲटॅकने आकस्मिक मृत्यू यावर रविवार दि. ९ जुलै २०२३ रोजी सायंकाळी ५ वाजता डफरीन चौक, आय. एम.ए. हॉल, सोलापूर येथे एका परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. सीपीआर म्हणजे हृदय व श्वासोच्छ्वास बंद पडल्यास ते त्वरित चालू करण्यासाठीच्या उपचाराचे प्रात्यक्षिक, भूलतज्ञ सादर करणार आहेत व उपस्थितांना प्रशिक्षण देणार आहेत. याच दिवशी रविवारी सकाळी १० वाजता दमाणी नगरातील लायन्स क्लब येथे परिसंवाद व प्रात्यक्षिक होणार आहे. त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजन समितीने केले आहे. या पत्रकार परिषदेस डॉ. सत्यशाम तोष्णीवाल, डॉ. अनुपम शहा, डॉ. रिझवान ऊल हक, डॉ. सिध्देश्वर रुद्राक्षी, डॉ. सुहास पुजार, डॉ. सतिश गोडसे आदी उपस्थित होते.

प्रा. डॉ. दिलीप कराड यांना रेड क्रॉसचा राष्ट्रीय पुरस्कार घोषित

सोलापूर : श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी येथील सुक्ष्मजीवशास्त्र विषयाचे निवृत्त प्रा.डॉ.दिलीप कराड यांना रेड क्रॉस तर्फे दिला जाणारा राष्ट्रीय पुरस्कार घोषित झाला आहे. तसे पत्र इंडियन रेड क्रॉस सोसायटीचे राष्ट्रीय मुख्यालय दिल्लीचे सेक्रटरी जनरल आर. के. जैन यांनी दिले आहे. पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम दि.१७ जुलै रोजी नवी दिल्ली येथे राष्टपती भवनात होणार आहे. केंद्रीय आरोग्य व कुंटूब कल्याण मंत्री व रेड क्रॉसचे चेअरमण डॉ.मनसुख मांडविय यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार आहे. त्यांचे बार्शी रेड क्रॉस चे मानद सचिव अजित कुंकूलोळ तसेच उपाध्यक्ष डॉ.बी. वाय.यादव,अशोक डहाळे संचालक सुभाषराव जवळेकर,प्रतापराव जगदाळे, बधिर मुक विद्यालयाचे सचिव संतोष सुर्यवंशी व रक्तपेढीचे चेअरमन डॉ.विक्रम निमकर मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.रामचंद्र जगताप यांनी अभिनंदन केले. श्री शिवाजी महाविद्यालय बार्शी चे प्राचार्य डॉ.अब्दुल शेख व इतर प्राध्यपकानी शुभेच्छा दिल्या.

अहम चित्रपट ७ जुलैला प्रदर्शित होणार

सोलापूर : एका इमानदार पत्रकाराच्या जीवनावर आधारित असलेला अहम हा मराठी चित्रपट येत्या ७ जुलै रोजी महाराष्ट्रभर प्रदर्शित होणार आहे. सोलापूर शहर जिल्ह्यात आठ ठिकाणी हा चित्रपट प्रदर्शित करण्यात येणार असल्याची माहिती निर्माता योगेश घोलप यांनी पत्रकार परिषदेत दिली. उमेद फिल्म प्रोडक्शन निर्मित हा चित्रपट आहे. संविधानावर निष्ठा ठेवून पत्रकार एका बलाढ्य साम्राज्याला कसा हादरा देऊ शकतो याचे चित्रण करण्यात आले आहे. सोलापूर, सातारा भागातील कलाकार येऊन हा चित्रपट पूर्ण करण्यात आला असून निश्चितच सर्वांना आवडेल अशी ही निर्मिती असल्याचेही निर्माता घोलप यांनी यावेळी सांगितले. या पत्रकार परिषदेस सहनिर्माता शमा शेख, दिग्दर्शक असिफ तांबोळी, सह दिग्दर्शक रशीद आतार, कार्यकारी निर्माता पांडुरंग शिंदे, कॅमेरामन विनोद बोडके, वनिता मुंडे, सुनील माने, हमीद शेख आदी उपस्थित होते.

ईटकळ येथील ब्रीजवरून ट्रक कोसळल्याने दोघे जखमी

सोलापूर : वेगाने येणाऱ्या ट्रक वरील चालकाचा ताबा सुटून ट्रक पुलावरून खाली कोसळल्याने दोघेजण जखमी झाले. हा अपघात हैद्राबाद महामार्गावरील इटकळ पुलावर शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडला . अशोक सुभाष सास्तुरे (वय ३०) आणि अर्जुन तुकाराम शिंदे (वय २९ दोघे रा. सास्तुर ता.उमरगा) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. ते दोघे कंटेनर मधुन नळदुर्ग ते सोलापूर असा प्रवास करीत होते. रात्री आठ वाजेच्या सुमारास ईटकळ येथील पुलावर ट्रक खाली कोसळल्याने दोघेजण जखमी झाले. अशी नोंद सिव्हील पोलीस चौकींत झाली आहे.

जयश्री मेलगे पाटील यांचे सेट परीक्षेत यश

हत्तरसंग : मार्च २०२३ मध्ये पुणे विद्यापीठाकडून घेण्यात आलेल्या स्टेट एलिजिबीलिटी टेस्ट अर्थात सेट परीक्षेमध्ये इतिहास या विषयातून उत्तीर्ण झाल्या आहेत. अवघड मानल्या जाणाऱ्या या परीक्षेत त्या इतिहास या विषयातून पात्र झाल्या आहेत. सध्या सौ. जयश्री मेलगेपाटील ह्या शिक्षिका म्हणून जि. प. शाळा देगांव मुली ता - उत्तर सोलापूर येथे कार्यरत आहेत. शैक्षणिक क्षेत्रात काम करत असताना आजपर्यंत त्यांच्या कामामुळे त्यांना विविध पुरस्कारही मिळाले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल विविध स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

ठाकरे गटाचे खा. संजय राऊत शनिवारी पंढरपुरात आले होते. यावेळी त्यांनी सत्पनिक विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेऊन प्रसादाचा आस्वादही घेतला.

कोळे येथे कोळेकर महास्वामींची मिरवणूक

नाझरे: महास्वामींच्या मठात बालसंस्कार शिबिर पारायण भजन कीर्तन गुरुदिक्षा रक्तदान महाप्रसाद वाटप करून गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी रुद्र पशुपती कोळेकर महास्वामी यांची मिरवणूकही काढण्यात आली. गुरुराज माऊली, माऊली माऊली गुरुराज माऊली, कोळेकर महास्वामी की जय, हर हर महादेव या जयघोषाने कोळे नगरी दुमदुमली व कोळेगावातून भव्य मिरवणूक काढून जयघोष करून गुरुप्रती वंदन करून गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी केली व महाराष्ट्र आणि कर्नाटक मधून हजारो भाविकांनी दर्शन घेतले.

टिकेकरवाडी येथे रेल्वेखाली वृद्ध इसमाची आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

सोलापूर ते टिकेकर वाडी लोहमार्गावर एका ६० वर्षीय इसमाने धावत्या रेल्वे खाली आत्महत्या केली. ही घटना आज शनिवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली .

उदयकुमार भास्कर देशपांडे (वय ६० रा. देसाईनगर, एमआयडीसी, सोलापूर) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. तो काल दुपारी घरातून गेला होता. आज दुपारी एक वाजेच्या सुमारास त्याने टिकेकरवाडी परिसरात रेल्वेखाली आत्महत्या केली. मृतदेहाशेजारी आढळलेल्या पिशवीवरून त्याची ओळख पटली. मयत अजयकुमार देशपांडे हा इलेक्ट्रिशियनचे काम करीत होता.त्याच्या पश्चात पत्नी आणि दोन मुले असा परिवार आहे. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार मणुरे पुढील तपास करीत आहेत.

देशाची आरोग्यक्षम पिढी घडविण्यात डॉक्टरांचे मोठे योगदान : स्वामी

सुराज्य/सोलापूर

देशाची आरोग्यक्षम पिढी घडविण्यात डॉक्टरांचे मोठे योगदान. असते असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी केले .

जागतिक डॉक्टर दिनाच्या निमित्ताने जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात सीईओ स्वामी बोलत होते. पुढे बोलताना सीईओ स्वामी म्हणाले की, डॉक्टरांना देवाचा दर्जा आहे. एखाद्याचा जिव वाचविण्याचे भाग्य डॉक्टरांना लाभले आहे. अवघा समाज तुमच्याकडे देवासमान मानतो त्यामुळे वैद्यकीय अधिकारी म्हणून काम करताना तुमची जबाबदारी वाढते. याशिवाय देशाची भावी पिढी व विद्यार्थी आरोग्यक्षम घडविण्यामध्ये डॉक्टरांचे मोठे योगदान आहे. ग्रामीण भागात आरोग्य सेवा देताना ग्रामस्थांशी सुसंवाद ठेवणे आवश्यक आहे. ग्रामस्थांशी सुसंवाद असेल तरच तुमच्याबद्दलचा विश्वास वाढून तुमचे प्रत्येक उद्दिष्ट साध्य होण्यास मदत होईल.

यावेळी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ सोनिया बागडे, जिल्हा माताबाल संगोपन अधिकारी डॉ अनिरुद्ध पिंपळे, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ बिरुदेव दुधभाते, सहाय्यक जिल्हा शल्य चिकित्सक डॉ श्रीकांत कुलकर्णी, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. मिनाक्षी बनसोडे, सहाय्यक संचालक कुष्ठरोग डॉ. मोहन शेगर, तालुका आरोग्य अधिकारी उत्तर सोलापूर डॉ. सुमित्रा तांबारे, तालुका आरोग्य अधिकारी अक्कलकोट डॉ. अश्विन करजखेडे, तालुका आरोग्य अधिकारी मोहोळ डॉ. अरूण पाथरूटकर यांच्यासह वैद्यकीय अधिकारी व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

मनसेच्या अभियानास सोलापुरात नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद

सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एकच सही संतापाची हे अभियान राबविण्यात आले. अभियानाचे उद्‌घाटन मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या हस्ते करण्यात आले. सोलापुरात याला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

सध्या महाराष्ट्रातील गरुड राजकारण कोण कोणाबरोबर जाते?, कोण कुठल्या तत्वाला तीलांजली देते? याचं नेमकं हिंदुत्व कुठे नक्की गेले?. सत्तेसाठी कोणी काही करायला लागले आहेत. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये संतापाची लाट उसळली आहे. जनतेला खोटी आश्वासने देऊन सगळे लोकप्रतिनिधी निवडून आले. निवडणुकींच्या वेळी जे वचने दिली होती, त्याला हरताळ फासण्याचं काम सध्याच्या राजकर्त्यांनी केले. म्हणून महाराष्ट्रातील जनतेमध्ये दुसरे काय नाही.

सर्व पक्षांनी लोकांचा भ्रमनिरश केल्यामुळे प्रचंड संताप आहे. आज जे महाराष्ट्रात मध्ये गढुळ वातावरण चालू आहे, या वातावरणाचा संताप व्यक्त करण्यासाठी हे अभियान राबवण्यात आल्याचे धोत्रे यांनी सांगितले. लोकांनी एक सही संतापाची म्हणून अभियानात सहभाग घेतला. यावेळी जिल्हाध्यक्ष विनायक महिंद्रकर, प्रशांत गिड्डे, लोकसभा अध्यक्ष प्रशांत इंगळे, शहराध्यक्ष जैनुद्दीन शेख, मनविसे राज्य उपाध्यक्ष अमर कुलकर्णी, उपजिल्हा अध्यक्ष सत्तार सय्यद, मनविसे जिल्हा अध्यक्ष अभिषेक रंपुरे, वाहतुक सेना शहर संघटक जितेंद्र टेंभूर्णीकर, राहुल अकलवाडे, पवन देसाई, गोविंद बनपट्टे, यश महिंद्रकर, वैभव रंपूरे, रवी स्वामी, सैफण जमखंडी, जयश्री हिरेमठ, रूपाली माळवदकर, शोभा साठे, ओंकार वाले, आदित्य महेंद्रकर, आदर्श पाटील, मनोज अंजीखाणे व अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

दौंड-कलबुर्गी-दौंड शटल रेल्वे सेवा सुरू करा

सुराज्य/सोलापूर

दौंड-कलबुर्गी- दौंड शटल रेल्वे सेवा सुरू करावी अशी मागणी प्रवासी सेवा संघाने खा. जय सिध्देश्वर महास्वामीजी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातून रेल्वे मार्गाचे दुहेरीकरण व विद्युतीकरण झाल्याने अनेक रेल्वे गाड्यांच्या गतीमध्ये वाढ झाली आहे .अनेक महत्त्वाच्या रेल्वे गाड्यांच्या सुटण्याच्या वेळेत मार्गावरील तांब्यांमध्ये बदल झालेला आहे. प्रदीर्घ कालावधीपासून सेवेत असलेल्या रेल्वे गाड्यांच्या वेळापत्रकामध्ये बदल झाल्यामुळे नियमित प्रवास करणारे प्रवासी व मासिक पासधारक व प्रवासी वर्गांची मोठी गैरसोय झालेली आहे . या महत्त्वाच्या रेल्वे गाडीच्या वेळेमध्ये बदल करून भिगवन वरून केम माढा मोहोळ होडगी हे थांबे बंद येतल्याने नियमित प्रवास करणारे प्रवासी व मासिक पासधारकांची मोठी गैरसोय होत आहे. याकरिता रेल्वे प्रशासनाने बदलत्या धोरणाचा विचार करून नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशाचे गैरसोय टाळण्याकरिता दौंड गुलबर्गा दौंड असे शटल मेनू रेल्वे सेवा सुरू करावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

मारहाण प्रकरणी काळेगाव येथील चौघांना तीन वर्षे कारावासाची शिक्षा

सुराज्य/बार्शी

शेताचा बांध फवारल्याच्या कारणावरून झालेल्या भांडणाप्रकरणी पोलीसांत तक्रार केल्याचा राग मनात धरून घरात घुसून चौघांना मारहाण केल्याप्रकरणी चौघांना तीन वर्षे सश्रम कारावास व प्रत्येकी १० हजार रूपये दंडाची शिक्षा येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी एच यु पाटील यांनी ठोठावली.

धनाजी रामचंद्र घायतिडक, दादासाहेब रामचंद्र घायतिडक, निवृत्ती हनुमंत घायतिडक, उज्वल उर्फ नितीन जनार्दन घायतिडक (रा. काळेगाव ता. बार्शी) अशी शिक्षा ठोठावण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. दरम्यान, आरोपींनी सत्र न्यायालयात अपिल केल्याने त्यांची जामीनावर मुक्तता झाली.

काळेगांव शिवारात फिर्यादी हनुमंत बाबुराव घायतिडक यांच्या बहिणीचे शेत असून शेतालगत आरोपी दादासाहेबचे शेत आहे. फिर्यादीच्या बहिणीचा स्वतंत्र बांध असून ते त्यांच्या बहिणीचे शेत बटईने करत आहे. बांधावर फिर्यादीची जनावरे चरण्यासाठी गवत राखून ठेवले होते. गवतावर कोणीतरी तणनाशयक औषध फवारले होते. दि २७ सप्टेंबर २०१५ रोजी दुपारी १ वाजता फिर्यादी व त्यांचा भाऊ विठ्ठल यांनी त्यांचे शेजारील शेतकरी दादा यास तू बांधावरील गवतावर औषध फवारले आहेस का असे विचारले असता त्यावर दादासाहेब याने होय मीच फवारले आहे, सदर बांध माझे मालकीचा आहे असे म्हणून फिर्यादीचा भाऊ विठ्ठल यास शिवीगाळी धमकी दिली होती. याबाबत फिर्यादीचा भाऊ विठ्ठल याने दादाविरोधात वैराग पोलीसांत तक्रार दिली होती. त्यानंतर संध्याकाळी ८ वाजता चार आरोपींनी आमचेविरूध्द पोलीस स्टेशनमध्ये तक्रार देता काय असे म्हणून फिर्यादीचे घरात घुसून फिर्यादीसह त्यांचे भाऊ, आई, वडील यांना काठया, गजाने मारहाण केली होती. याबाबत फिर्यादीने वैराग पोलीसांत सदरच्या चौघांविरोधात फिर्याद दिली होती. वैराग पोलीस ठाण्यातील तत्कालीन पो. ना.विकास माने यांनी तपास करून दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले. या खटल्यात ६ साक्षीदार तपासण्यात आले. दोषारोप सिध्द झाल्याने चौघांना शिक्षा ठोठावण्यात आली. सरकारतर्फे ॲड पी.जे. कुलकर्णी यांनी काम पाहिले. कोर्ट पैरवी म्हणून पो. कॉ. अजिज शेख यांनी काम पाहिले.

भाजप पदाधिकाऱ्यांचा ठाकरे गटात प्रवेश

सुराज्य/सोलापूर

सर्वांनी ठाकरे यांना साथ द्यावी: कोकीळ

पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब हे आपल्या पाठीशी आहेत, भाजपा आणि शिंदे गटाशी लढत आहेत,आणि येणाऱ्या निवडणुकीमध्ये शिवसेना आपल्या ताकदीवर सोलापूर महानगपालिका,तसेच विधानसभेवर भगवा फडकवेल, यासाठी सर्वांनी ठाकरे यांना साथ द्यावी, असे आवाहन संपर्क प्रमुख अनिक कोकीळ यांनी केले.

शिवसेना ठाकरे गटाकडून शहरात प्रभाग तिथे शाखा आणि ग्रामीण भागामध्ये गाव तिथे शाखा आणि घर तिथे शिवसैनिक मोहिमेचा शनिवारी शुभारंभ करण्यात आला. यावेळी सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांच्या उपस्थितीत यावेळी भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी प्रवेश केला.

यावेळी विकी धोत्रे, अंकुश धोत्रीकर, आदित्य काळपगार, सिध्दाराम अडपत, बसवराज तंबाके, अमर बिनशी, सागर शिंदे, दीपक परळकर, संजय चौगुले, रमेश धारा, नरसप्पा रायचूरकर, पवन पुली, आणि अनेक भाजपा कार्यकर्त्यांनी हातात शिवबंधन बांधून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षात प्रवेश केला.याप्रसंगी जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम बेर्डे, शहरप्रमुख विष्णू कारमपुरी, माजी राज्यमंत्री आणि सहसंपर्कप्रमुख उत्तमप्रकाश खंदारे , माजी जिल्हाप्रमुख अजय दासरी, उपजिल्हाप्रमुख दत्ता वानकर, संतोष केंगनाळकर, , युवासेना सहसचिव पूजा खंदारे, उपजिल्हासंघटक मंगला थोरात,प्रताप चव्हाण ,शहर संघटक अतुल भवर आदी उपस्थित होते.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळवे यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळवे.

पडत्या काळात जिल्ह्यातील निष्ठावंतांनी सोडली पवारांची साथ

सुराज्य/डी. एस. गायकवाड

राष्ट्रवादीच्या स्थापनेच्या काळापासून सोलापूर जिल्ह्यावर शरद पवारांचे वर्चस्व राहिले आहे अगदी निष्ठावंत निष्ठावंत म्हणून अनेकांनी पवार साहेबांना गोंजारले. आपल्या नेतृत्वाला पवार साहेबांच्या माध्यमातून आकार ऊकार दिला पण त्याच नेतेमंडळींनी पवारांच्या पडत्या काळात त्यांची साथ सोडून दिली असून त्यांचे हे बेगडी प्रेम जिल्ह्यामध्ये सध्या एक चर्चेचा विषय बनला आहे.

सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासामध्ये शरद पवारांचे असणारे योगदान हे कोणीही नाकारू शकणार नाही. नेहमीच या जिल्ह्याने पवार साहेबांना तोला मोलाची साथ दिली. पवारांनी जिल्ह्याला काही कमी पडू दिले नाही. म्हणून जिल्ह्याने पवारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत त्यांची ताकद नेहमी वाढवण्याचा प्रयत्न केला पण हे करत असताना जिल्ह्यातील नेतेमंडळींनी आपलाही विस्तार वाढ केला. मोहिते पाटलांनी तर शरद पवारांना हत्तीचे बळ दिले पण पक्षांतर्गत वादावादी मुळे ते बाहेर पडले. ते ज्यावेळेस बाहेर पडले त्यावेळी राष्ट्रवादी एक संघ होती, त्यामुळे लोकांना देखील त्याचे काय वाटले नाही. पण सध्या पवार घरामध्येच फूट पडल्याने अजित पवारांनी शरद पवारांची साथ सोडत आपला गट्टा घेऊन ते भाजपात दाखल झालेले दिसत आहेत. यामुळे शरद पवार एकाकी झुंज देताना दिसत आहेत. अशा परिस्थितीत जिल्ह्यातील राष्ट्रवादीच्या नेते मंडळींनी पवार साहेबांना साथ देणे लोकांना अपेक्षित होते पण असे न घडता अगदी पवार साहेबांना दैवत मानणारे त्यांना सोडून अजित पवार गटात सामील झाले. माढ्याचे आमदार बबनराव शिंदे, आमदार संजय शिंदे,माजी आमदार राजन पाटील, सांगोल्याचे माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील ही मंडळी पवारांची विश्वसनीय मंडळी म्हणून ओळखली जात होती. अगदी पवार साहेबांच्या वाढदिवसाला मोठमोठे कार्यक्रम घेऊन निष्ठेच्या पालख्या वाहताना ते दिसले. शरद पवारच दैवत, तेच आमचे साहेब, तेच नेते म्हणत आपल्या राजकीय वातावरणाला आणखी पोषक त्यांनी बनवले. पण त्यांचे हे बेगडी प्रेम होते हे सध्याच्या वातावरणावरून सिद्ध झाले आहे अशीच चर्चा सध्या सोलापूर जिल्ह्यातील शरद पवार कट्टर समर्थकांमधून सुरू असल्याचे दिसत आहे.

या नेते मंडळींना शरद पवारांनी काय कमी केले असाही सूर या निमित्ताने ऐकावयास मिळत आहे. माढ्याच्या शिंदे बंधूंना तर शरद पवारांनी जिल्ह्याचे नेतृत्व बनण्याची ताकद दिली. पण त्यांनीही पवार साहेबांची साथ सोडली.

मोहोळच्या राजन पाटलाची ताकद पूर्वीपासून होती त्यामुळे त्यांना जास्त दोष देता येणार नाही, कारण पडत्या काळात त्यांनी पक्षाची बुज राखली, पक्षांतर्गत त्रास होऊन सुद्धा पक्ष सोडला नाही पण सांगोल्याच्या दीपकआबांना मोठ्या पवारांनी जी ताकद दिली प्रेम केले ते नक्कीच विसरण्यासारखे नाही त्यामुळे त्यांनी आपला टांगा अजित पवारांकडे वळवला. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील हे कट्टर समजले जाणारे शरद पवार समर्थक अजित पवार गटात गेल्याने त्यांच्या निष्ठेच्या चर्चेला सध्या उजळणी मिळताना दिसत आहे.

निष्ठेच्या झाल्या चिंधड्या

राजकारणात आज कुणाचेच काही खरे राहिले नाही, कुणावर विश्वास टाकायचा हे देखील अवघड झाले आहे. वेळ आली की निघून जाणे,साथ सोडणे. यामुळे राजकारणावरचा पुरता विश्वास सर्वसामान्यांचा उडाला आहे. ज्यांना पोसले तेच रुसले अशीच परिस्थिती आहे. त्यामुळे निष्ठेच्या चिंधड्या झाल्या असून राजकारणातील तत्त्वे ध्येयधोरणे धुळीस मिळाली आहेत. प्रत्येक जण आपापल्यापुरता विचार करत कुणालाही टांग मारताना दिसत आहे.

आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे डॉक्टर डे कार्यक्रमाचा फज्जा

सुराज्य/सोलापूर

आषाढी वारीच्या काळात डॉक्टर डे एक जुलै रोजी आल्याने आरोग्य विभागाने तो कार्यक्रम साजरा केला नव्हता . त्यानंतर शुक्रवारी हा कार्यक्रम जिल्हा परिषदेच्या शिवरत्न सभागृहात घेण्यात आला . या कार्यक्रमासाठी आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांनी कुठल्याच प्रकारची तयारी दर्शविली नव्हती. त्यामुळे कार्यक्रमाचा फज्जा उडाल्याचे दिसून आले.



या वेळी उत्कृष्ट काम करणाऱ्या डॉक्टरांचा सत्कारही करण्यात येणार होता . मात्र असे असताना सत्कारासाठी व स्वागतासाठी फुले, गुच्छ वगैरे कार्यक्रमात आणून ठेवायला पाहिजे होते .मात्र एकाही कर्मचाऱ्यांनी अशा प्रकारची तयारी केली नाही. हा प्रकार जाणून बुजून केला होता की चुकून झाला होता याबाबत उलटसुलट चर्चा सुरू आहे.

थेट कार्यक्रमाला सुरुवात झाल्यानंतर या बाबी लक्षात आल्यानंतर जिल्हा परिषदेचे सी .ई. ओ. स्वामी संबंधित कर्मचाऱ्यांवर भडकले. आरोग्य विभागाच्या कामकाजाच्या फायलीवर कोट्यवधी रुपयांच्या सह्या करून घेता तुम्हाला साधे हार-फुले घेऊन यता आले नाही. काहीतरी वाटायला पाहिजे अशा शब्दात सर्वांना सुनावले.

यानंतर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक करायला पाहिजे होते परंतु डॉ बागडे यांनी नकार दिला. त्यानंतर त्यांच्या सहाऱ्यानेही नकार दिला त्यामुळे स्वामी पुन्हा चिडले आणि स्वतःच हातात माईक घेऊन मार्गदर्शक करण्यासाठी बोलायला लागले. त्यावेळी सभागृहामध्ये जमलेल्या आरोग्य कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करण्यापूर्वी एकातरी कर्मचाऱ्याच्या अधिकाऱ्याच्या चेहऱ्यावर हास्य आहे का ? सगळे निराश असलेले चेहरे दिसत आहे असे म्हणत त्याने भाषण सुरुवात केली.जिल्हा परिषदेमध्ये प्रत्येक महापुरुषांची जयंती, पुण्यतिथी तसेच वेगवेगळे दिवस साजरा केले जातात. हे कार्यक्रम घेण्यामागे वेगळी कल्पना असते. अशा कार्यक्रमातून कर्मचाऱ्यांमध्ये आणि अधिकाऱ्यांमध्ये चांगला संदेश जावा ही भूमिका राहिल्याचे त्यांनी यावेळी सांगितले .

स्वामी यांनी कर्मचाऱ्यांना दिल्या कानपिचक्या

कोट्यावधीच्या बिलांवर माझ्या सह्या घेता साधे मोठे बुके आणता आले नाहीत का? मला सांगितले असते तर मी बुके घेऊन आलो असतो असे म्हणून जिल्हा व्यवस्थापक वैशाली थोरात यांच्यावर नाराजी व्यक्त केली. आपल्या भाषणात ही स्वामी यांनी उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना चांगल्याच कानपिचक्या दिल्या.

सराईत गुन्हेगार माने स्थानबद्द

सुराज्य/सोलापूर

सर्वसामान्य नागरिकांसह व्यापाऱ्यांमध्ये दहशत पसरवून प्राणघातक हल्ला करणे, यासह गंभीर गुन्हे केल्याप्रकरणी सराईत गुन्हेगार अदित्य शैलेंद्र माने (वय- २१, रा. थोबडे मळा, देगाव नाका, सोलापूर) याच्यावर एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली. पोलीस आयुक्तांनी आदेश बजावून त्याची येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली.

अवैध मार्गाने आर्थिक फायदा मिळविण्यासाठी माने याने जुना देगाव नाका, हब्बू वस्ती, अमराई, मरीआई चौक, दमाणी नगर, वसंत विहार, शेटे नगर, केगाव, न्यू लक्ष्मी चाळ परिसरात दहशत व भिती निर्माण केली. साथीदारांच्या मदतीने जबरी चोरी, हल्ला करुन अनेकांना इजा पोहचवली. व्यापार्यांसह सर्वसामान्य नागरिकांकडे खंडणी मागण्याचे गुन्हे माने याने केल्याची नोंद पोलिसात झाली. चार गंभीर गुन्हे करून सामाजिक शांततेला बाधा निर्माण करणाऱ्या अदित्य मानेवर सन २०२१ मध्ये दोनवेळातिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. मात्र त्यानंतरही त्याच्यामध्ये सुधारणा झाली नाही. यामुळे पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांनी त्याच्यावर स्थानबध्दतेची कारवाई करण्याचे आदेश दिले. ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक विर्शेद्रसिंग बायस, स्थानबध्द पथकातील पोलीस हवालदार विनायक संगमवार, सुदीप शिंदे, अक्षय जाधव, विशाल नवले केली.

बंडखोरीचे वादळ आता सांगोल्यात आबांच्या नातवाला स्वकियांकडून आव्हान

सुराज्य/सांगोला

राज्यातील शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसमधील गटबाजीचे वादळ घोंगावत असतानाच शेतकरी कामगार पक्षाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जाणाऱ्या सांगोला तालुक्यातही शेकापमध्ये बंडखोरीची लागण होते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. सांगोल्यात शेकापमधील विविध नेत्यांनी प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक घेऊन थेट नेतृत्वालाच आव्हान दिले आहे.

राज्यात शिवसेना फुटीचे वादळ शमते तोच राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीचा धुरळा उडाला. आता राष्ट्रवादी कुणाची हा प्रश्न राज्यभरात चर्चिला जात असतानाच एकेकाळी महाराष्ट्रातील सर्वात प्रबळ विरोधी पक्ष असलेल्या शेतकरी कामगार पक्षालाही बंडखोरीची लागण होत असल्याचे चित्र दिसू लागले आहे. सावे (ता. सांगोला) शनिवारी तालुक्यातील अनेक नेतेमंडळी व विविध गावच्या प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक घेऊन शेकापचे सध्या नेतृत्व करीत असलेले डॉ. बाबासाहेब देशमुख यांना थेट इशारा दिला. या बैठकीत शेतकरी कामगार पक्षाच्या चिटणीस मंडळाचे सदस्य बाबासाहेब कारंडे, माजी सभापती बाळासाहेब काटकर, माजी जिल्हा परिषद सदस्य सचिन देशमुख, माजी उपसभापती संतोष देवकते, शाहू मेटकरी, हणमंत कोळवले, अमोल खरात, कोकरे सर आधी प्रमुख नेत्यांसह विविध गावचे कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना बाबा कारंडे म्हणाले, प्रसंगी पक्ष विकू पण आम्हाला आमदार व्हायचे हीच सध्या काहींची भूमिका दिसून येत आहे. काहींच्या स्वार्थासाठी आयाडी आणि तडजोडी करण्याच्या नादात पक्षाचे नुकसान होत आहे. जातीपातीचे राजकारण केले नाही आणि करणार नाही ही आबासाहेबांची शिकवण आहे. मात्र, अन्याय खपवून घेणार नाही असा इशाराही त्यांनी दिला.

माजी जिल्हा परिषद सदस्य सचिन देशमुख म्हणाले, शेकापमधे जातीयवाद वाढला आहे. तो नाही संपला तर पक्ष संपायला वेळ लागणार नाही. असेच नेतृत्व कायम राहिले तर कधीच आपला पक्ष सत्तेत येणार नाही. आबासाहेबांच्या शेवटच्या दिवसात तुम्ही कुठे होता? असा थेट सवालही त्यांनी केला आहे.

प्रास्ताविक करताना पंचायत समितीचे माजी उपसभापती संतोष देवकते म्हणाले, राज्यात पुत्रप्रेम आणि रक्ताच्या वारसाला प्राधान्य देण्याच्या नादात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसची ही अवस्था झाली, असा आरोप त्यांनी केला. आपला पक्ष शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसपेक्षा प्रबळ नाही. त्यामुळे अजूनही वेळ गेलेली नाही नेतृत्वाने याची गंभीर दखल घ्यावी, अन्यथा याची जबर किंमत मोजावी लागेल.

पक्षातच जिरवा जिरवी सुरू आहे

या बैठकीमध्ये अनेक नेत्यांनी कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सध्या शेकाप पक्षातच जिरवा जिरवीची भाषा सुरू आहे. नेतृत्वच पक्षात जिरवा – जिरवीची भाषा करीत असेल तर पक्ष वाढेल कसा?– अशी चिंता मान्यवर नेत्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केली.

राष्ट्रवादीची आज बैठक; पक्ष निरीक्षक माने सोलापुरात

सुराज्य/सोलापूर

राष्ट्रवादी मध्ये दोन गट पडल्यामुळे रिक्त झालेल्या जागी पुन्हा निवडी करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसची रविवार सकाळी ११ वाजता बैठक होणार आहे. यासाठी सोलापूर शहराचे निरीक्षक शेखर माने सोलापूरात येणार आहेत. या जागी इच्छुक असलेल्याच्या मते जाणून घेऊन, त्यांनी पक्षात आता पर्यंत केलेल्या कामाचा आढवा घेऊन ती नावे प्रदेशपातळीवर पाठवली जाणार आहेत.

सोलापूर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर मध्य विधानसभा, दक्षिण सोलापूर विधानसभा, उत्तर विधानसभा अध्यक्ष आणि कार्यध्यक्ष यांच्यासह सोलापूर शहर जिल्हा युवक अध्यक्ष, कार्यध्यक्ष तसेच शहर सरचिटणिस यांनी अजित पवार गटात सामिल झाले आहेत. यांच्यावर पक्षविरोधी कारवाई केल्याचा ठपका ठेवत पक्षातून निलंबित केले आहे. त्यामुळे या जागा रिक्त झाल्या आहे. या जागी नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडी केल्या जाणार आहेत. या पदासाठी इच्छुक असलेल्याची संवाद साधत त्यांच्या त्यांनी केलेल्या संघटनेच्या कार्याचा आढवा घेण्यासाठी पक्षाचे निरीक्षक शेखर माने रविवारी सोलापूर दौऱ्यांवर येणार आहे. सकाळी ११ वाजता ही बैठक होणार आहे. महापौर बंगल्याच्या मागे असलेल्या शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यालयात ही बैठक होणार आहे.तरी शहरातील ज्येष्ठ नेते प्रदेश पदाधिकारी प्रांतिक सदस्य, नगरसेवक, माजी नगरसेवक, महिला आघाडी, विधानसभा अध्यक्ष कार्याध्यक्ष, फ्रंटल व सर्व सेल अध्यक्ष, कार्याध्यक्ष, शहर कार्यकारणी पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन शेखर माने यांनी केले आहे.

शिवाजी नगर येथे विकास कामांचे भूमिपूजन

सुराज्य/सोलापूर

शिवाजीनगरसह, राजहंस नगर, शिवशक्ती नगर यासह विविध भागात आ. विजयकुमार देशमुख यांच्या निधीमधून रस्ते आणि ड्रेनेज कामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी किरण देशमुख, राजु आलुरे, आनंद भंवर, विनय ढेपे, यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

महापालिका आयुक्तांकडून कारवाईचा धमाका

झोन अधिकारी नाईकवाडी यांच्यासह चौघे निलंबित

सुराज्य/सोलापूर

महापालिका नगररचना विभागाकडे कार्यरत नसताना नगर रचना विभागाला डावलून बांधकाम परवानग्या देण्याची चक्क समांतर बेकायदेशीर व्यवस्था निर्माण केल्याचे धक्कादायक प्रकरण उजेडात आले आहे. या प्रकरणात गांभीर्याने लक्ष देत महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी महापालिका झोन अधिकारी नाईकवाडी यांच्यासह दोन अवेक्षक आणि एक वरिष्ठ श्रेणी लिपिक अशा चौघांजणांवर निलंबनाची कारवाई केली आहे. महापालिका आयुक्तांनी कारवाईचा धमाका केल्याने महापालिका प्रशासनात खळबळ उडाली आहे.

याप्रकरणी महापालिकेचे सहाय्यक अभियंता तथा विभागीय अधिकारी (झोन क्रमांक - ८) झेड.ए. नाईकवाडी , अवेक्षक श्रीकांत बसण्णा खानापुरे (नगररचना डीपी युनिट), नगर अभियंता कार्यालयातील अवेक्षक शिवशंकर बळवंत घाटे आणि सध्या कामगार कल्याण जनसंपर्क कार्यालयातील वरिष्ठ श्रेणी लिपिक आनंद वसंत क्षीरसागर या चौघा जणांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. तसे आदेश महापालिका आयुक्तांनी काढले आहेत.

नगररचना विभागाकडे कार्यरत नसताना, बांधकाम परवान्याबाबतचे कोणतेही कामकाज हाताळण्याचे अधिकार नसताना बिपीएमएस प्रणालीद्वारे प्रकरणे निकाली काढण्याची यंत्रणा कार्यान्वीत असतानासुध्दा तिचा अवलंब न करता ऑफलाईन पध्दतीने बांधकाम परवानगी दिल्या तसेच नगर रचना विभागाला डावलून बांधकाम परवानग्या देण्याची समांतर बेकायदेशीर व्यवस्था निर्माण केल्याप्रकरणी अवेक्षक श्रीकांत खानापूरे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. तसे आदेश महापालिका आयुक्त शितल तेली उगले यांनी शनिवारी काढले आहेत.

तुकाराम राठोड यांनी राठोड यांनी माहिती अधिकारांतर्गत चार बांधकाम परवानगीचे कागदपत्रे मिळण्याबाबत १९ एप्रिल २०२३ रोजी अर्ज केला होता. त्यानुसार कागदपत्रे देणेकामी बांधकाम विभागाकडील अभिलेख्यात चार फाईलचा शोध घेतला असता, कार्यालयात नस्ती सापडल्या नाहीत. कार्यालयात नस्ती उपलब्ध न झाल्याने संबंधीत बांधकामधारकांकडे याबाबत चौकशी केली असता या चार पैकी दोन प्रकरणातील बांधकाम परवाना प्रमाणपत्र व नकाशा उपलब्ध झाले. त्यापैकी एका नकाशावर श्रीकांत खानापुरे यांची स्वाक्षरी दिसून आली आहे. यास्तव संबंधित बांधकाम धारकाला त्यांच्या जागेची सर्व कागदपत्रे, बांधकाम परवानगी, मंजुर नकाशे देण्याबाबत व सुरू असलेले बांधकाम त्वरीत थांबविणेबाबत पत्र देण्यात आले.तेव्हा त्यापैकी बरीच पत्रे पत्ता अपूर्ण असल्याने परत आली.

बांधकाम परवानगीची एक प्रत कर आकारणी विभागास देण्यात येत असते ती प्रत उपलब्ध करून घेण्यासाठी मालमत्ता कर विभागाकडे पत्र व्यवहार केला असता सदर विभागाकडेही बांधकाम परवानगीची प्रत पाठविली नसल्याचे निदर्शनास आले. नगर रचना विभागाला डावलून बांधकाम परवानग्या देण्याची समांतर बेकायदेशीर व्यवस्था या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी निर्माण केल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते. या चौघांच्या गैरवर्तनासाठी अधिक चौकशी करणे गरजेचे आहे. या चौकशीस बाधा येऊ नये म्हणून या चौघांना निलंबनाधिन ठेवणे आवश्यक आहे. त्यामुळे खानापुरे यांना दिनांक ७ जुलै २०२३ रोजी कार्यालयीन वेळेनंतर सेवेतून निलंबित करण्यात येत असल्याचे महापालिका आयुक्तांनी आदेशात म्हटले आहे.

आणखी किती बांधकाम परवाने दिले ?

हे अधिकारी व कर्मचारी नगर रचना विभागाच्या बांधकाम परवाना विभागाकडे कार्यरत नसताना बांधकाम परवाना देणे, नियमाचे उल्लंघन करणे, ऑनलाईन पद्धतीने कामकाज चालू असताना, ऑफलाईन पद्धतीने बांधकाम परवानगी देणे आदी कामे करत होते, अशी माहिती आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी आणखी किती बांधकाम परवाने दिले आहेत, नेमकं काय काय या गंभीर प्रकरणात दडले आहे ? त्याचे चित्र चौकशीअंती स्पष्ट होणार आहे.

प्रथम
पुण्यस्मरण
तत्त्वदर्शी प्रज्ञावंत कवयित्री आणि लेखिका
वै. सौ. उर्मिला वि. कराड
(वैकुंठवास – आषाढ कृ. ७, बुधवार, दि. २० जुलै २०२२)

|| आठवणी ||
आठवणींच्या आसाभवती
स्मृतिचक्राचा फेरा
भेट आठवे गत जीवाची
क्षण भेटीचा सारा
वाट संपता आयुष्याची
पुन्हा न फिरणे मागे
त्या वाटेवर कुणी विणावे
वहिवाटीचे धागे
तेथे फुलल्या स्मृतीसुमनांचा
कुणी वहावा भारा?

थोर शिक्षणतज्ञ विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांच्या सुविद्य पत्नी,
वै. सौ. उर्मिलाताई (काकू) कराड यांच्या वैकुंठगमनाला वर्षपूर्ती होत आहे.
त्या निमित्ताने त्यांच्या ज्ञानमय, भक्तीमय आणि विठ्ठलमय जीवनाच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी एक कार्यक्रम स्मृती सुगंध!
अवश्य उपस्थित राहुन संपूर्ण कराड परिवाराच्या संवेदनात सहभागी व्हावे, ही विनंती.

सविनय
प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड
आणि समस्त कराड परिवार

रविवार, दि. ९ जुलै २०२३ | स्थळ : सरस्वती निवास, रामेश्वर (रूई), ता. जि. लातूर

पूजा
सकाळी ९.०० वा

ह. भ. प.
श्री. बापूसाहेब मोरे-देहूकर
यांच्या सुश्राव्य किर्तनाचा कार्यक्रम
सकाळी ११.०० वाजता

प्रसाद
दुपारी १.०० वा.

सलगर (बु) गावातील दारू बंद करा...

✔ सुराज्य/लक्ष्मीदहिवडी

मंगळवेढा तालुक्यातील दक्षिण भागामध्ये आमदार समाधान आवताडे यांचा गाव भेट दौरा सुरू आहे. हा दौरा सलगर बुद्रुक येथे आला असता सलगरच्या सभेत गौळाबाई पांडुरंग सवईसर्जे या वृद्ध महिलेने आमदार अवताडे यांच्यासमोर हात जोडून आमच्या गावातील दारू बंद करा अशी कळकळीची विनंती केली असता आमदार अवताडे यांनी पोलीस प्रशासनाला जाब विचारत उपस्थित असलेले सहाय्यक पोलीस निरीक्षक अंकुश वाघमोडे यांना साहेब... येथून पुढच्या दौऱ्यात तुम्ही येऊ नका मात्र या गावातील दारू बंद करा अशी तंबी दिली.

यावेळी सदर वृद्ध महिलेने गावातील दारू बंद नाही झाली तर मी तुमच्या ऑफिसला येणार आहे असे म्हणत आपली कैफियत आमदार अवताडे यांच्यासमोर मांडली. गाव भेट दौऱ्यामध्ये गावोगावी दारू विक्री सुरू होत असल्याचे निदर्शनास आले असून पोलिसांना दारू बंद करण्याच्या सक्त सूचना आमदारा अवताडे यांनी यावेळी दिल्या. शनिवारी आ. आवताडे यांचा ११ गावचा भेट दौरा करण्यात आला. यावेळी त्यांचे सोबत प्रांत अधिकारी आप्पासाहेब समिंदर,तहसीलदार मदन जाधव,तालुका कृषी अधिकारी गणेश श्रीखंडे,पंचायत समितीचे विस्तार अधिकारी ज्ञानेश्वर साळुंखे, मंगळवेढा पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक वाघमोडे, वनविभागाच्या चैत्राली वाघ, पशुसंवर्धनचे सुहास सरगर,प्राथमिक आरोग्य विभागाचे नंदकुमार शिंदे ,ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता राजकुमार पांडव, शिक्षण अधिकारी पोपट लवटे,नायब तहसीलदार सोमनाथ साळुंखे, यांचे सह विविध खात्याचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी येड्रव, खवे, जित्ती, बावची, जंगलगी, सलगर खु, सलगर बु, लवंगी,आसबेवाडी, शिवनगी, सोड्डी या गावांचा दौरा पूर्ण केला. शनिवारी दिवसभर या आढावा बैठकींमध्ये विविध गावात दिलेल्या निधीचे वितरण व्यवस्थित झाले आहे का? कामे व्यवस्थित सुरू आहेत का? याचा आढावा अवताडे यांनी येतला.

सर्व समस्या मार्गी लागतील: आ. आवताडे

जलजीवन योजनेत ठराविक वस्त्या घेतल्या आहेत. बाकीच्या वस्त्यांचा समावेश झाल्याशिवाय काम सुरू करू नका, ग्रामसेवक निष्क्रिय,रस्ता मागणी,पिण्याचे पाणी या प्राथमिक अडचणी अनेक गावांतील लोकांनी मांडल्याने स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही वीज व पाण्यासाठी धडपड करावी लागत असल्याची शोकांतिका व्यक्त करत येत्या काही दिवसात या सर्व समस्या मार्गी लागतील असे आश्वासन आ आवताडे यांनी नागरिकांना दिले.

माढा मतदारसंघात निघणार रासपची जनस्वराज यात्रा

✔ सुराज्य/अक्कलकोट

राष्ट्रीय समाज पक्ष आयोजित जनस्वराज यात्रा माढा लोकसभा मतदारसंघात सोमवार दिनांक १० जुलै रोजी सकाळी आठ वाजता विठ्ठल रखुमाई मंदिर पंढरपूर येथून पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी मंत्री आमदार महादेव जानकर यांच्या नेतृत्वाखाली सुरुवात होणार आहे अशी माहिती राष्ट्रीय समाज पक्षाचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनील बंडगर यांनी दिली आहे.

पंढरपूर तालुक्यातून ठिक सकाळी आठ वाजता या रॅलीला सुरुवात होऊन १० आणि दिनांक ११ हे दोन दिवस माढा लोकसभा मतदारसंघातील प्रत्येक तालुक्यातून चार चाकी गाड्यांच्या ताफ्यात ही रॅली जाणार आहे. राष्ट्रीय समाज पक्षाच्या मिशन माढा लोकसभा मतदारसंघातील ऐतिहासिक , धार्मिक, संस्कृतिक, शक्ती स्थळांना अभिवादन करत प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी या रॅलीचे सभेत रूपांतर होऊन मार्गदर्शन केले जाणार आहे. हा पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आपापल्या भागात या रॅलीचे जोरदार स्वागत करत यात सहभाग नोंदवावा, असे आवाहन सुनील बंडगर यांनी केले आहे.

पदोन्नतीबद्दल भोसलेंचा महाळुंग ग्रामस्थांतर्फे सत्कार

✔ **श्रीपूर** : महाळुंग येथील तलाठी सिध्देश्वर भोसले यांची नुकतीच तलाठी या पदावरून मंडल अधिकारी या पदावर पदोन्नती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार ग्रामस्थांच्यावतीने सहकार महर्षी शंकराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखान्याचे माजी व्हाईस चेअरमन रामचंद्र सावंत पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मंडलाधिकारी लोखंडे भाऊसाहेब, उपनगराध्यक्ष भीमराव रेडे पाटील , संचालक नानासाहेब मुंडफणे, नगरसेवक व राष्ट्रवादीचे नेते राहुल रेडे पाटील, रावसाहेब सावंत पाटील, शिवाजी रेडे, सोसायटी चेअरमन बंडू वाळेकर ,अनिल मुंडफणे, मौलाचाच्या पठाण, अमर पिसाळ देशमुख , विक्रम लाटे, मारुती रेडे पाटील , संजय भगत भारत मुंडफणे, रघुनाथ लाटे , संजय भोसले, रवि लवाळे, कृषी सहाय्यक शिंदे कोतवाल संभाजी चव्हाण आदी उपस्थित होते. यावेळी सिध्देश्वर भोसले तलाठी यांनी गेली पाच वर्ष महाळुंग ग्रामस्थांनी केलेले सहकार्य बद्दलसर्वांचे आभार मानले.

सुर्वे प्रतिष्ठानतर्फे जिल्हा परिषद शाळेंना वह्या वाटप

✔ **नातेवुते** :नातेपुते येथील अंकुश भाऊ प्रतिष्ठानच्या वतीने नातेपुते येथील सहा जिल्हा परिषदेच्या शाळांना विद्यार्थ्यांसाठी वह्यांचे वाटप करण्यात आले. यामध्ये नातेपुते येथील कन्याशाळा, केंद्रशाळा, पालखी मैदान, पांढरेवस्ती,बरडकरवस्ती, बोराटेवस्ती या शाळेतील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास प्रतिष्ठानचे अध्यक्ष विनायक सुर्वे, उपाध्यक्ष अर्जुनराव पिसाळ,सचिव ,जगदीश देशपांडे, सदस्य सागर साळुंखे, नगरसेवक बी.वाय.राऊत वकील साहेब, श्री.देविदास भैय्या चांगण,मंगेश दीक्षित,.वैशाली दीक्षित, नातेपुते केंद्राचे केंद्रप्रमुख प्रशांत सरूडकर, कन्याशाळेच्या मुख्याध्यापिका जाधव आदी उपस्थित होते. नातेपुते येथील कन्या शाळा व केंद्रशाळा या दोन्ही शाळा शाळेतील विद्यार्थी मी दत्तक येत असून या शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविण्यात येणार असल्याचे अध्यक्ष विनायक सुर्वे यांनी सांगितले.

यमाईदेवी आश्रम शाळेत साहित्य वाटप

✔ **उ. सोलापूर** : आमदार सुभाष देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली, मनिष देशमुख मित्रपरिवाराच्यावतीने कै प्रदीप पवार यांच्या स्मरणार्थ मार्डी येथील यमाई देवी आश्रम शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले आहे. यावेळी प्रवीण पवार, विष्णू जगताप, श्रीरंग सूर्यवंशी, संतोष पवार, सर्जेराव पाटील, संजय खरटमल, प्रीतम पवार, आनंद हजारे, आश्रम शाळेच्या संस्थापक अशोक लांबतुरे, अध्यक्षा सुरेखा लांबतुरे, मुख्याध्यापक, शिक्षक, आणि

ओंकार साखर कारखान्याच्या मिल रोलरचे पूजन

✔ **पिली** : माळशिरस तालुक्यातील चांदापुरी येथील ओंकार साखर कारखान्याच्या युनीट क्रमांक एकच्या २०२३-२०२४ च्या मिल रोलरचे पूजन कारखान्याचे जनरल मॅनेजर भिमराव वाघमोडे व निकम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडुन चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांचे आभार मानले. यावेळी चिफ इंजिनिअर तानाजी देवकते, फायन्स मॅनेजर किरण चव्हाण, ऊस पुरवठा अधिकारी विष्णु गोरे, स्टोअर किपर, धन्यकुमार जमदाडे, एच.आर. गणेश धायगुडे, सुरक्षा अधिकारी मोहन घोडके आदी उपस्थित होते.

रिपाइंची आज अकलूजला बैठक

✔ सुराज्य/वेळापूर

अकलूज शासकीय विश्रामगृह येथे रविवार ९ रोजी १२ वाजता रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले तालुका कार्यकारिणीची आढावा बैठक माळशिरस तालुक अध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे.

याप्रसंगी बैठकीस महाराष्ट्र राज्य पदाधिकारी, पश्चिम महाराष्ट्र पदाधिकारी,जिल्हा पदाधिकारी, उपस्थित राहुन मार्गदर्शन करणार आहेत. तालुका पदाधिकारी यांनी आपल्या भागातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते सदस्य यांना निरोप देऊन सर्वांना सोबत घेऊन बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. नव्याने क्रियाशील सभासद वाढविणे, शाखा नुतनीकरण करणे, पक्ष संघटन मजबूत करणे बाबत चर्चा करणे, पक्ष बांधणी साठी गांव भेट दौरा करणे, आवतेवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे. आदी विषयावर यावेळी चर्चा होणार आहे. बैठकीला कार्यकर्त्यांनी पदाधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे असे आव्हान तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे, तालुका सरचिटणीस मारुती खांडेकर, तालुका कार्याध्यक्ष समाधान भोसले, युवक तालुकाध्यक्ष दशरथ नवगिरे, युवक तालुका सरचिटणीस प्रवीण साळवे, युवक कार्याध्यक्ष विनोद रणदिवे यांनी केले आहे.

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून विकासकामांसाठी १६ कोटींचा निधी

आ. सुभाष देशमुख यांची माहिती

✔ सुराज्य/सोलापूर

मुख्यमंत्री ग्राम सडक योजना टप्पा-२ संशोधन व विकास अंतर्गत दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातील पाच कामांना १६ कोटी रुपये निधी मंजूर झाला आहे, अशी माहिती आमदार सुभाष देशमुख यांनी दिली. या कामाबाबत आमदार देशमुख यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे वारंवार पाठपुरावा केला होता.

राज्यात शिंदे- फडणवीस सरकार आल्यापासून दक्षिण तालुक्याला

आतापर्यंत २०० कोटींपेक्षा जास्त विकास निधी मिळाला आहे. आमदार देशमुख यांनी वारंवार मतदार संघातील रस्त्यांबाबत निधी मिळावा म्हणून वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा केला होता. नुकतेच मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा दोन मधून दक्षिण विधानसभा मतदारसंघातील पाच कामांना आणखी १६ कोटी रुपये मिळाले आहेत. कुमठे ते कुलकर्णी तांडा रस्ता -२ कोटी ७५ लाख, डोणगाव ते पाथरी - २ कोटी २५ लाख, खानापूर ते कोळी वस्ती -२ कोटी ८० लाख, विंचूर ते अंत्रोळी - ३ कोटी ४० लाख, भंडाराकवठे ते विंचूर तांडा - ४ कोटी ८० लाख असा निधी मिळाला आहे. दक्षिण मतदार संघातील आणखी प्रलंबित कामांसाठी जास्तीत जास्त विकास निधी आणण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे आमदार सुभाष देशमुख यांनी सांगितले. हा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आमदार देशमुख यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, ग्रामविकास मंत्री गिरीशजी महाजन यांचे आभार मानले आहेत.

पीक विम्याच्या नोंदीसाठी एक रुपयाच द्यावा : निगडे

✔ सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट तालुक्यात सन २०२३ - २४ पासून 'सर्वसमावेशक पीक विमा योजना' राबविण्यात येत आहे. आता शेतकऱ्यांना एक रुपयात पीक विम्याची नोंदणी करता येणार आहे. म्हणून शेतकऱ्यांनी कोणतीही अतिरिक्त रक्कम नोंदणीसाठी देऊ नये, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी हर्षद निगडे यांनी केले आहे.

काही सामान्य सेवा केंद्रे शेतकऱ्यांकडून अतिरिक्त पैसे घेत असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. म्हणून शेतकरी बांधवांनी कोणतीही अतिरिक्त रक्कम नोंदणीसाठी देऊ नये. शेतकरी हिश्श्याची विमा हप्ता रक्कम राज्य शासनामार्फत भरण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना अतिरिक्त रकमेची मागणी होत असल्यास संबंधित पीक विमा कंपनीचे कार्यालय, तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन निगडे यांनी केले आहे.

पंढरीत मनसेच्या वतीने एक सही संतापाची अभियान

✔ सुराज्य/पंढरपूर

महाराष्ट्रात चालू असलेल्या गढूळ राजकारणाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने एक सही संतापाची हे अभियान शनिवारी सकाळी आठ ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत पंढरपूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे राबविण्यात आले.

याचे उद्घाटन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते दिलीप बापू धोत्रे यांच्या हस्ते आज करण्यात आले. यावेळी तालुकाध्यक्ष शशिकांत पाटील ,शहराध्यक्ष संतोष कवडे, विधानसभा अध्यक्ष अनिल बागल ,सहकार सेनेचे कृष्णा मासाळ, उपशहर अध्यक्ष गणेश पिंपळनेरकर ,उपअध्यक्ष ओंकार आंब्रे, विभाग अध्यक्ष नागेश इंगोले, सागर घोडके ,सुरज देवकर, वैभव इंगोले ,विद्यार्थी सेनेचे उपजिल्हा अध्यक्ष अवधूत गडकरी, तालुका अध्यक्ष प्रताप भोसले ,प्रथमेश धुमाळ, उत्तम कुळकर्णी, विक्रम पाटील, चैतन्य विधाते आदी उपस्थित होते. याला पंढरपूरकरांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

अजित पवार गटाची द. सोलापूरची सोमवारी बैठक

✔ सुराज्य/द. सोलापूर

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली दक्षिण सोलापूर तालुका आणि जुळे सोलापूरसह विधानसभा मतदार संघाच्या विकास कामांचे नियोजन आणि संघटनात्मक बांधणीबाबत चर्चा करण्यासाठी बैठक बोलावण्यात आली आहे.

सोमवार दि.१० जुलै रोजी दुपारी २ वाजता सोलापूरच्या शासकीय विश्रामगृह येथे राष्ट्रवादीचे नेते डॉ.बसवराज बगले यांच्या पुढाकारातून ही बैठक आयोजित केली आहे दक्षिण सोलापूर आणि जुळे सोलापूरच्या प्रलंबित विकास कामांना निधी देणार आहेत. त्यासाठी प्रलंबित कामांचा पाठपुरावा करण्याचा निर्धार डॉ.बगले यांनी केला आहे. दक्षिण तालुका आणि विधानसभा मतदार संघातील सर्व पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्त्यांनी बैठकीला हजर रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

मंद्रूप पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गावात कायदा व सुव्यवस्था राखली : मांजरे

✔ सुराज्य/द. सोलापूर

मंद्रूप पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गावात कायदा व सुव्यवस्था राखण्यात यश आले, असे प्रतिपादन मंद्रूप पोलीस ठाण्याचे तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे यांनी केले.

मंद्रूपचे मावळते सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे आणि नूतन सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत हुल्ले यांची नियुक्ती झाल्याने त्यांचा पोलीस ठाण्याच्या वतीने सत्कार करण्यात आला. तालुक्यातील मंद्रूप पोलीस स्टेशन येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे यांची सोलापूर शहर येथे बदली झाल्याने त्या ठिकाणी नूतन सहाय्यक पोलीस निरीक्षक पदी प्रशांत हुल्ले यांची नियुक्ती झाली असून तसेच पोलीस उपनिरीक्षक शहाजी कांबळे यांचा मंद्रूप येथील सेवेचा कार्यकाल पूर्ण झाल्याबद्दल त्यांचाही निरोप समारंभ पोलीस बांधवांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या हस्ते त्यांचा सत्कार

नूतन सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत हुल्ले यांचे स्वागत

करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर पोलीस उपनिरीक्षक अमितकुमार करपे यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

एका वर्षाच्या कार्यकाळात अवैध व्यवसायिकांच्या मुसक्याही आवळल्या विविध सण जयंती उत्सव निवडणुकींत जनतेने पोलिसांना नेहमीच साथ दिली आहे. नूतन सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत हुल्ले यांनी मांजरे यांचा कामकाजाचा वारसा आपण पुढे चालू ठेवणार आहोत परिसरातील कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रसंगी आपण कठोर कारवाई करणार असल्याचे सांगितले.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती पोलीस उपनिरीक्षक अमितकुमार करपे अशोक ढवळे यांनीही मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास पोलीस कर्मचारी, पोलीस पाटील आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रमोद आसदे यांनी करून आभार मानले.

प्रथम वर्ष पदवी इंजिनिअरिंग कॅम्प रजिस्ट्रेशन प्रक्रियेला मुदतवाढ

✔ सुराज्य/पंढरपूर

'प्रथम वर्ष अभियांत्रिकी (पदवी) च्या प्रवेशासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन प्रक्रिया ४ जून २०२३ पासून सुरु झाली असून ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे, कागदपत्रे पडताळणी व छाननी आदी बाबी सुरू झाल्या होत्या. या प्रक्रियेला ०७ जुलैपर्यंत मुदत होती परंतु आता सोमवार, दि.१० जुलै २०२३ पर्यंत सदर रजिस्ट्रेशन करता येणार आहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी दिली.

स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या नियोजनात्मक मार्गदर्शनाखाली स्वेरी अभियांत्रिकी मध्ये ऑनलाईन रजिस्ट्रेशनची सुविधा मोफत उपलब्ध करून दिली आहे. अभियांत्रिकी (पदवी) महाविद्यालयात प्रथम वर्ष प्रवेशासाठीची रजिस्ट्रेशन प्रक्रिया २४ जून पासून सुरू झाली होती. या प्रक्रियेला आता दुसऱ्यांदा मुदतवाढ मिळाली असून आता ही प्रक्रिया सोमवार, दि.१० जुलै २०२३ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत चालणार आहे. त्यानंतर भरलेल्या अर्जाच्या संदर्भातील कागदपत्रे व प्रमाणपत्रे यांची पडताळणी करून खात्री करणे यासाठी मंगळवार, ११ जुलै २०२३ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत मुदत दिली आहे. सर्व विद्यार्थी व पालकांनी स्वेरीत येऊन ही प्रक्रिया येथील तज्ञ शिक्षकांमार्फत पूर्ण करून घ्यावी.' असे आवाहन प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा.करण पाटील यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी अधिष्ठाता प्रा.करण पाटील (९५९५९२११५४), प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.सतीश लेंडवे (९५४५५५३८७८) व प्रा. यु.एल.अनुसे (९१६८६५५३६५) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

अक्कलकोट तालुक्यात मतदार यादी शुद्धीकरण कामास युद्धपातळीवर प्रारंभ

✔ सुराज्य/अक्कलकोट

आगामी येणाऱ्या सर्व निवडणुकींच्या अनुषंगाने मतदार यादी शुद्धीकरण कामास युद्धपातळीवर प्रारंभ करण्यात आले आहे. याबाबत अवर सचिव ,उपमुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र शासन यांच्याकडून संमधीत तहसील कार्यालय पत्र प्राप्त झाले आहे. त्यावरून तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांच्या मार्गदर्शनाखाली कामे करण्यात येत आहे.

मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडून जिल्हाधिकारी सोलापूर याना मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनर्रनिरीक्षण कार्यक्रम पत्र नुकताच प्राप्त झाले आहे. त्यानुसार प्रत्येक तहसीलदारांना आदेश दिले आहेत२१ जुलै ते २९ सप्टेंबर या कालावधीत अधिकारी यांनी घरोघरी भेट देणे, मतदार यादी, ओळखपत्रातील त्रुटी दूर करणे, प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करणे, दावे, हरकती स्वीकारणे, दावे, हरकती निकालात काढणे, अंतिम प्रसिध्दीसाठी आयोगाची परवानगी मागणे, डाटाबेस अध्यावत करणे, पुरवणी याद्याची छपाई करणे मतदार यादीचे अंतिम प्रसिध्दी करणे, हा कार्यक्रम दि.१ जून-२३ पासून सुरू झाले असून तब्बल .५ जानेवारी-२४ पर्यंत कार्यक्रम सुरू राहणार आहे. यामुळे मतदार यादीचे अध्यावत, शुद्धीकरण होण्यास मदत होणार आहे. जसजसे यादीत अडचणी येत असतात. तसतसे उपक्रम कालावधी निश्चित करून शासन वेळोवेळी याकामी गामभिर्याने काम करीत आहेत.

१ जून-२३ पासून या कामाला सुरुवात करण्यात आले आहे. दि.१० जुलै रोजी तहसिल कार्यालयात सकाळी ११ वाजता विविध राजकीय पक्ष, नेते, सामाजिक कार्येकर्ते, अध्यक्ष,पत्रकार आशा घटकांचे, व्यक्तींचे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

– तहसीलदार बाळासाहेब सिरसट

जेपी सोशल फौंडेशनच्यावतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

सोलापूर : भूदेवी नगर नई जिंदगी येथील जे. पी. सोशल फौंडेशनच्यावतीने १०वीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनींचा सन्मानपत्र, पारितोषिक व पुष्प देऊन सत्कार करण्यात आला तसेच नीट परीक्षेत सोलापूर जिल्ह्यात प्रथम क्रमांक येऊन उत्तीर्ण झालेले अब्दुल्लाह मेहंदीअली सय्यद याचाही विशेष सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रस्तावांना फौंडेशनचे सल्लागार रियाज अत्तार यांनी केले. अध्यक्षस्थानी तंजीम हमदर्द इन्सानियतचे अध्यक्ष मेहबूब नदाफ हे होते.

यावेळी पत्रकार इलियास सिद्दीकी आणि जीवन यादव यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे शैक्षणिक बाबतीत मार्गदर्शन केले व पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिले. कार्यक्रमास सर्व प्रमुख मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक हाजी तौफिक हत्तुरे, सलीम पाम्मा, जुबेर कुरेशी, दौला कुमठे, रियाज सय्यद, वाहिद बिजापुरे, इलियास सिद्दीकी, जीवन यादव, इलियास सर, अजहर जहागीरदार, सिकंदर शेख, फौंडेशनचे अध्यक्ष जाफर पटेल, उपाध्यक्ष मुज्जो शेख, खजिनदार अनिस शेख, सचिव जिलानी शेख, एम. एस. मोईन, रईस सरकार, इरफान शेख, इसाक शेख, हुसेन शेख, शाकीर पठाण उपस्थित होते.

हजरत ख्वाजा ऊरुसनिमित्त कार्यक्रम



सोलापूर : जिल्ह्यातील प्रसिद्ध हजरत ख्वाजा ऊरुस १२ जुलैपासून सुरु होत आहे. दोन दिवस चालणाऱ्या या ऊरुससाठी महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, राजस्थान, कर्नाटक, गुजरात, गोवा, मुंबई, पुणे इतर अन्य शहरातून आपले नवस फेडण्यासाठी भक्तांच्या रांगा लावलेल्या असतात. दोन दिवसाच्या ऊरुसमध्ये धार्मिक विधींचे कार्यक्रम होतात. धार्मिक पद्धतीच्या कव्वालीचा कार्यक्रम देखील आयोजित केला आहे. दूरदुरुन आलेल्या भक्तांसाठी भोजनही ठेवले आहे. ऊरुसची शोभायात्रा १२ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता संदल मिरवणूक निघतो. १३ जुलै रोजी महाप्रसादाचा व कव्वालीचा कार्यक्रम आयोजित केला आहे, अशी माहिती हजरत ख्वाजा समाजसेवी संस्थेचे अध्यक्ष सैफी सज्जादेनशीन हारुन पटेल आणि सचिव शफीक पटेल यांनी दिली आहे.

एनएबी अंधशाळेत गुरुपौर्णिमा साजरी

सोलापूर : एनएबी जिल्हा शाखा, सोलापूर संचलित एनएबी निवासी अंधकार्यशाळा, सोलापूर येथे गुरुंचा गौरव करण्यासाठी गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. कार्यशाळेचे अधीक्षक देवेंद्र भंडारे यांच्या हस्ते सरस्वतीमातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये दीपांजली केसकर, अभिजीत रामगुडे, हर्षद पुंडगे, पांडुरंग खरसडे, दावल शेख यांनी गुरुविषयी मनोगत व्यक्त केले. चंद्रकांत खंडागळे, दयानंद चौगुले, देविदास इमडे यांनी गीत गाऊन आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी कार्यशाळेचे अधीक्षक देवेंद्र भंडारे, रामचंद्र कुलकर्णी, रियाज मुल्ला यांचा विद्यार्थ्यांकडून सत्कार करण्यात आला. तसेच ग्यानम्मा म्हेत्रे, शुभम वांझरे व संदेश कांबळे यांचाही सत्कार करण्यात आला. रामचंद्र कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना गुरुंची महिमा सांगितली. सूत्रसंचालन हर्षद पुंडगे यांनी केले तर आभार पांडुरंग खरसडे यांनी मानले.

बत्तुल विद्यालयात मोफत गणवेश वाटप

सोलापूर : आदर्शमाता व्यंकम्माबाई बत्तुल माध्यमिक विद्यालयात गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना शाळेच्यावतीने मोफत गणवेशाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास मुख्याध्यापक प्रमोद बत्तुल हे अध्यक्षस्थानी म्हणून लाभले होते. यावेळी इयत्ता आठवी ते इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गणवेश वाटप करण्यात आले. याप्रसंगी मान्यवरांनी शाळेत गणवेशाची आवश्यकता का असते याचे महत्त्व सांगून गणवेश हे एकतेचे प्रतिक आहे तसेच सर्वांना समानता दाखविणारा आहे, हे मनोगतातून सांगितले. या कार्यक्रमास सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चांद शेख यांनी केले.

क्रांतिवीर मंडळाच्या अध्यक्षपदी गायकवाड

सोलापूर : क्रांतिवीर लहुजी वस्ताद तरुण मंडळाच्या अध्यक्षपदी विश्वेश्वर भिमराव गायकवाड यांची निवड क्रांतीवीर लहुजी वस्ताद तरुण मंडळ, लष्कर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०३व्या जयंती उत्सव वार्षिक बैठक समाज अध्यक्ष भिमराव गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी अध्यक्ष म्हणून विश्वेश्वर गायकवाड यांची एकमताने अध्यक्षपदी निवड करण्यात आली.पदाधिकारी पुढीलप्रमाणे, उपाध्यक्ष विकास जरिपटके, आदित्य पारधे, सचिव अमोल केंदळे, खजिनदार महेश तेजबिंदे, कार्याध्यक्ष मुकेश गायकवाड, सहसचिव सुमित जरिपटके, प्रसिद्धीप्रमुख सुरज डोलारे, ऋतिक शिंदे, राकेश जोगदंड. मिरवणूक प्रमुख आनंत डोलारे, महेश जोगदंड, रवी लोंढे, सिद्राम जरिपटके, सुनील गायकवाड, ऋषीकेश रणदिवे, दत्ता गायकवाड, उमेश कोरे, गणेश भवाळे, आदित्य पारधे.

विचारक्रांती संस्थेतर्फे शालेय साहित्य वाटप

सोलापूर : राजर्षी शाहू महाराज व गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून सोलापुरात विचारक्रांती बहुद्देशीय सामाजिक संस्था स्थापन करुन अश्विनी हॉस्पिटल समोरील मूकबधीर शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी शालोपयोगी साहित्य व खाऊवाटप करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक शिक्षकवृंद आणि संस्थेचे अध्यक्ष सुरज जगधने, उपाध्यक्ष पृथ्वीराज शिरसे, सचिव राहुल शिवशरण, नागसेन बंगाळे, अतुल कांबळे, कुणाल गाडे, सुमित कांबळे, मनीष शिवशरण, शुभम गायकवाड आदी सदस्य उपस्थित होते.

शेतकरी संघटनेचे नरहरी वारे यांचे निधन

द. सोलापूर : भंडारकवठे येथील रहिवासी तथा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ नेते नरहरी कलप्पा वारे (वय-९५ यांचे) अल्पशा आजाराने निधन झाले आहे. शेतकरी संघटनेचे नेते कै.वसंतराव आपटे यांचे जवळचे स्नेही तथा सिद्धेश्वर कारखान्याचे कर्मचारी नंदकुमार वारे यांचे वडील होत. त्यांच्या पश्चात दोन मुले, चार मुली,दोन सुना,नातवंड असा परिवार आहे.

मंगळवेढा येथे एका रात्री दोन घरफोड्या; ६४ हजाराचे दागिने पळविले

सुराज्य/सोलापूर

मंगळवेढा येथील सप्तशृंगी नगरात चोरट्याने एका रात्री दोन ठिकाणी घरफोड्या करून रोख रकमेसह ६४ हजाराचे दागिने पळविले. या दोन्ही चोऱ्या गुरुवारी पहाटेच्या सुमारास घडल्या . मंगळवेढा येथील सप्तशृंगी नगरात राहणाऱ्या चिदानंद गंगाधर स्वामी यांच्या घराच्या पाठीमागील दरवाजाचे कोंडा तोडून चोरट्याने आत प्रवेश केला . आणि कपाटातील ४४ हजार रुपये रोख आणि दोन ग्रॅम सोन्याचे दागिने पळविले. अशाच पद्धतीने त्यांच्या घराजवळ राहणाऱ्या अप्पा गरंडे यांच्या घरातून रोख १ हजार ५०० आणि एक ग्राम सोन्याचे दागिने असा १० हजाराचा माल चोरट्याने पळविला . मंगळवेढा पोलिसात याची नोंद झाली आहे. सहाव्यक निरीक्षक पिंगळे पुढील तपास करीत आहेत.

कुंभेज येथील शेतातून दीड लाख रुपये किमतीच्या जर्सी गायी लंपास

करमाळा -तालुक्यातील कुंभेज येथे राहणाऱ्या एका शेतकऱ्याच्या गोठ्यातून चोरट्याने १ लाख ३५ हजार रुपये किमतीच्या ३ जर्सी गायी चोरून नेले . ही चोरी शुक्रवारी पहाटेच्या सुमारास घडली . यासंदर्भात अशोक दादाराव शिंदे (रा. कुंभेज ता.करमाळा) यांनी करमाळा पोलिसात फिर्याद दाखल केली. त्यांच्या शेतातील गोठ्यात जर्सी गाई आणि इतर जनावरे बांधण्यात आली होती. चोरट्याने शुक्रवारी पहाटेच्या सुमारास

गोठ्यात बांधलेल्या तीन गाई चोरून नेल्या . असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे . हवालदार गवळी पुढील तपास करीत आहेत .

भांडणाचा राग मनात धरून मारहाण ; दोघांवर गुन्हा

मागील भांडणाचा राग मनात धरून संगणमत करत प्रकाश विश्वनाथ पवार आणि अनिता प्रकाश पवार यांनी फिर्यादी दिलीप राम पवार (वय-४६,रा. नरसिंग नगर,मुळेगाव रोड) यांना हाताने व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली.तसेच प्रकाश पवार याने दगड घेऊन फिर्यादी दिलीप पवार यांच्या डोक्यात मारून जखमी केले आहे. ही घटना ५ जुलै रोजी नरसिंग नगर येथे घडली.याप्रकरणी दिलीप पवार यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून प्रकाश पवार व अनिता पवार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल चव्हाण हे करीत आहेत.

चोरट्याने घरातून मोबाईलसह रक्कम पळवली

अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करत घरातून दोन मोबाईलसह रोख रक्कम असा १४ हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना दि.६ ते ७ जुलै दरम्यान मिथीली नगर शेटे वस्ती येथे घडली.याप्रकरणी सचिन पृथ्वीराज चौहान (वय-४६,रा.मिथीला नगर) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल दराडे हे करीत आहे.

मानव उत्थान समितीतर्फे गुरुपौर्णिमा साजरी

सुराज्य/सोलापूर

मानव उत्थान सेवा समिती, पंढरपूर आश्रमात पावन पर्व गुरुपौर्णिमा भक्तीभावाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी मानवधर्मचे प्रणेते सद्गुरुदेव सत्पालजी महाराज यांच्या प्रतिमेची पूजा-पाठ करुन आश्रमांचे संत महात्मा लक्खीबाईजी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. यानंतर श्री गुरु महाराज चालीसा पठण करण्यात आले. यानंतर प्रेमीभक्त शाहूराजे भोसले यांनी 'धन्य-धन्य' हो प्रदक्षिणा, सद्गुरुरायांची... मराठी भजन सादर करण्यात आले.

संत महात्मा लक्खीबाईजी सर्व प्रेमीभक्तांना गुरुपौर्णिमाचा शुभेच्छा देत.... गुरु म्हणजे अंधारातून उजेडात मार्ग दाखविणारा मार्गदर्शक, आपल्या बुद्धी सामर्थ्याने शिष्याच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश निर्माण करुन शिष्याचे जीवन सुखमय व उज्वल करणारे व अंतिम मुक्तीचा, सद्गतीचा लाभ मिळून देणारे श्री सद्गुरुच होय.

गुरुमुळे शिष्य ८४ लक्ष योनीच्यापासून चक्रापासून वाचू शकतो आणि परमेश्वरात लिन होऊ शकतो. हे केवल गुरुच करु शकतात. यासाठी प्रत्येकाने गुरु धारण केले पाहिजे.

या कार्यक्रमाला सोलापूर, कराड, कोल्हापूर, सांगली, सातारा, कवठा, नळदुर्ग, लातूर, खोची, पंढरपूर व विविध भागातून भक्तगण उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद प्राप्त घेण्यात आला. कार्यक्रमाला सुभाष निकम, शशिकांत देशमाने, महादेव सांगवे, शिवाजी माने, रवींद्र देसाई, जनार्दन कुमरकुंठला, ओमकार काटकर, अंबादास तवटम, तिरुपती संबारी या सर्वांचे विशेष सहकार्य प्राप्त झाले.

खाजगी शिक्षक पतसंस्थेची सर्वसाधारण सभा

सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्हा खाजगी प्राथमिक शिक्षक पतसंस्थेची सर्वसाधारण सभा पतसंस्थेचे चेअरमन कल्लप्पा फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी पतसंस्थेने सभासदांना १५ टक्के लाभांश आणि रिबेट ९ टक्के जाहीर करण्यात आले.

सर्वप्रथम कै. चं. का. कोळशेट्टी यांच्या । प्रतिमेस अध्यक्ष कल्लप्पा फुलारी यांच्या हस्ते तसेच संचालक मंडळाच्या उपस्थितीत पुष्पहार अर्पण करण्यात आला.

उपस्थित सभासदांच्या समोर सर्वसाधारण सभेचे कामकाज सुरु होऊन सर्व विषय मंजूर करण्यात आले. सर्वसाधारण सभेत राजश्री तडकासे, महानंदा सोलापुरे, राजूदास पवार, कृष्णप्पा सालोटगी, अशोक होळीकट्टी, भिमराया बिराजदार, रमेश बिडवे, मिन्हाजोद्दीन काझी, संगीता आकेन, श्रीनिवास गुजर, किरण गाटे आदी उपस्थित होते

सर्वसाधारण सभेस उपस्थिती असणाऱ्या सर्व सभासदांचे चेअरमन कल्लप्पा फुलारी यांनी आभार मानले. यावेळी पतसंस्थेचे सचिव महादेव होमकर, खजिनदार नूरजहां पेरमपल्ली, संचालक कृष्णा हिरेमठ, विश्वजित माणिकशेट्टी, रमेश बेडगे, शरद शिंदे, विद्या शिंपी, संगीता सक्करगी, आरती गायकवाड, शोभा चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

लघुशंका केल्याच्या कारणावरुन दोघा तरुणांना मारहाण

सुराज्य/सोलापूर

रिक्षा स्टॉपजवळ लघुशंका केल्याच्या किरकोळ कारणावरुन पाचजणांनी मिळून दोघा तरुणांना लाथाबुक्क्या, काठीने, बेल्टने मारहाण करुन जखमी केले. अशोक चौक मस्तानी हॉटेल शेजारी शुक्रवारी ही घटना घडली. निखिल पोपट डुकरे (वय- २०) व सुजल नागेश भांडेकर (वय १९, रा. बुधवार पेठ, वडार गल्ली, सोलापूर) असे जखमी तरुणांचे नाव आहे.यातील जखमी दोघे हे अशोक चौकाकडे कामाच्या निमित्ताने गेले होते. तेथे हॉटेल मस्तानी, रिक्षा स्टॉपजवळ लघुशंका केल्याच्या कारणावरुन जखमींना प्रसाद उर्फ पिंटू गायकवाड याच्यासह पाचजणांनी बेदम मारहाण करुन जखमी केले. यामध्ये दोघांच्याही डोक्याला, छातीला , बरगडीला मार लागला. ते स्वत: शासकीय रुग्णालयात दाखल झाले. उपचार काळातच दोघेही पळून गेले. सिव्हील पोलीस चौकीत या घटनेची नोंद झाली आहे.

सामाजिक न्याय विभाग सचिवांना डॉ. आंबेडकर ट्रेड युनियनचे निवेदन

सुराज्य/सोलापूर

महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनच्या वतीने सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभागाचे सचिव सुमंत भांगे यांना लाड - पागे समिती प्रकरणी निवेदन देण्यात आले.

औरंगाबाद खंडपीठामध्ये दि. २३ मार्च २०२३ तारखेपासून लाड पागेच्या शिफारशी नुसार होणाऱ्या नियुक्तीस स्थगिती दिली. त्या अनुषंगाने राज्याचे सामाजिक न्याय विशेष विभागाचे सचिव सुमंत भांगे यांच्याशी महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनचे अध्यक्ष कामगार नेते बापूसाहेब सदाफुले यांनी चर्चा केली. हा निकाल तातडीने लागावा व सामाजिक न्याय विशेष विभागाने जाणीवपूर्वक लक्ष घालून शासनाचे वकील यांना हा प्रश्न त्वरित निकाली काढावा म्हणून योग्य त्या सूचना कराव्यात. २३ मार्च २०२३ रोजी लाड

पागे समितीच्या शिफारशीनुसार होणाऱ्या नियुक्तीस लागलेली स्थगिती ही महाराष्ट्रातील नगरपरिषद, नगरपालिका,महानगरपालिका व राज्यातील साफसफाई चे काम करणाऱ्या या सर्व अनुसूचित जाती मधील (नवबौध्द,मेहतर,वाल्मिकी मातंग) व एस सी मधील सर्व समाजातील साफसफाईचे काम करत आलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाची अडचण झाली आहे.

यामुळे या सर्व कर्मचाऱ्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येत असून या आदेशामुळे साफसफाईचे काम करणाऱ्या कामगारांच्या कुटुंबाचे आर्थिक नुकसान होत आहे. दिनांक २३ मार्च २०२३ पासून उच्च न्यायालय (औरंगाबाद) यांच्या आदेशानुसार देण्यात आलेली स्थगिती आदेश शिथिल व्हावी व या सर्व कर्मचाऱ्यांच्या वारसदारांना तात्काळ लाड पागे समितीचा लाभ मिळावा अशी मागणी निवेदनाद्वारे ट्रेड युनियनच्या शिष्टमंडळाद्वारे करण्यात आली.

यावेळी सचिव सुमंत भांगे यांनी येत्या पुढील सुनावणीच्या तारखेला आपण यात स्वतःजरूर लक्ष घालून प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन शिष्टमंडळास दिले. यावेळी युनियनचे अध्यक्ष कामगार नेते बापूसाहेब सदाफुले, सायमन गट्टू, ट्रेड युनियनचे उपाध्यक्ष बी.टी. जाधव, वाहन चालक प्रमुख पिंटू जेटीथोर सफाई कामगार नेते श्रीनिवास रामगल उपस्थित होते.

शिक्षकांनी तंत्रज्ञान आत्मसात करावे : पाटील

सुराज्य/सोलापूर

शिक्षकांनी एकजूट राहणे आणि अद्ययावत राहून नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक असल्याचे सांगली पतसंस्थेचे संस्थापक पा. बा. पाटील यांनी व्यक्त केले.

मत सोलापूर जिल्हा खाजगी, प्राथमिक शिक्षक व शिक्षकेतर सेवक सहकारी पतसंस्थेकडून नुमवि शाळा, डफरीन चौक येथील सभागृहात सेवानिवृत्त शिक्षकांचे सत्कार आणि गुणवंत विद्यार्थी पारितोषिक वितरण कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष पा. बा. पाटील, शिक्षणविस्तार अधिकारी हरीश राऊत, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे अधिव्याख्याते आय. पी. नदाफ, शिक्षक महासंघ सांगलीचे जिल्हा अध्यक्ष तसेच शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन अरविंद गावडे, सांगली जिल्हा सचिव महेश संकपाळ, सोलापूर शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन कल्लप्पा फुलारी, सचिव महादेव होमकर आणि सर्व संचालक मंडळासह आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी संजय पाटील, दीपा मिर्जी, सुरेखा चौधरी, प्रिया कुलकर्णी, राजश्री पुजारी, अर्जुन हरळे, संगीता जुगदार, श्रीधर बोगार, भारत शिंदे या सेवानिवृत्त शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. यांनी सूत्रसंचालन केले तर सचिव महादेव होमकर यांनी सर्वांचे आभार मानले.

मृत्यूस कारणीभूत ; अज्ञात वाहन चालकावर गुन्हा

सुराज्य/सोलापूर

हत्तुरे वस्ती येथील भाजी मार्केट येथे सार्वजनिक रोडवर अज्ञात वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालून सोनाबाई नामदेव व्हनकवडे यांना धडक देऊन त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरला आहे.अशी फिर्याद हवालदार शिलीसिद्ध तुकाराम बहिर्जे यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात दिली आहे. .ही घटना २८ जुलै रोजी घडली.पुढील तपास शेख हे करीत आहेत.

चोरट्याने पार्किंग मधून दुचाकी पळवली

चाटला साडी सेंटर जवळील पार्किंग मध्ये पार्क करून ठेवलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.ही घटना २७ जून रोजी घडली.याप्रकरणी किरण कपूरचंद्र शहा (वय-४९,रा.उमा नगरी,समृद्धीग्रीन अपार्टमेंट,निराळे वस्ती) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास पो.हे.कॉ. मनोहर हे करीत आहेत.

खोटे गुन्हे दाखल करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यास निलंबित करा

प्रहार जनशक्ती पक्षाची मोर्चा काढून मागणी

सुराज्य/अक्कलकोट

खोटे गुन्हे दाखल करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात यावे, अशी मागणी करीत प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने अक्कलकोट तालुका डीवायएसपी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला.

पो. नि. जितेंद्र कोळी, सपोनि भाविकट्टी हे एकतर्फी कारवाया करीत आहेत. अल्पसंख्यक समाजातील तक्रारदारांची बाजू अजिबात ऐकून

घेतले जात नाही. त्यांना तात्काळ निलंबित करण्यात यावी, अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. त्यांची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कायदेशीर कडक कारवाई करण्याची मागणीचे निवेदन जिल्हा पोलीस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे यांना देण्यात आले आहे. परंतु त्याचा कोणताच परिणाम न झाल्याने प्रहार जनशक्ती पक्षाच्यावतीने यांच्या विरोधात आक्रोश मोर्चा काढण्यात आला. आ. बच्च कडु यांच्या माध्यमातून अधिवेशन काळात हा मुद्दा उपस्थित करू, असा इशारा प्रहार जनशक्ती पक्षाचे सोलापूर जिल्हा संपर्क प्रमुख जमीर शेख यांनी दिला. यावेळी प्रहारचे अजित कुलकर्णी, खालिद मनियार, मोहसिन तांबोळी, महेश शिंगाडे, निरंजन ख्याडे, तायप्पा कोळी आदी कार्येकर्ते उपस्थित होते. एका शेतीचा वाद न्याय प्रविष्ट असताना पोलीस बळाचा दुरुपयोग करीत आमच्यावर खोटे गुन्हे दाखल करण्यात आल्याचे पीडित शाकीर पटेल यांनी सांगितले.

पोलिसांनी रितसर कारवाई केली आहे. खोट गुन्हा दाखल करण्याचे प्रश्नच येत नाही. शासकीय अधिकारी काम करीत असताना त्यांना बंदोबस्त देणे क्रमप्राप्त आहे. त्यांनी दिलेल्या निवेदनाचे चौकशी करू

– डीवायएसपी विलास यामावर

घस्टनेत जे काय केले आहे ते रीतसर कारवाई केली आहे. त्यांनी त्या गुन्ह्यामधून नाव कमी करण्यासाठी आमच्यावर दबाव आणला होता. त्यास आम्ही जुमानले नाही. त्याला चिडून जाऊन आमच्या विरुद्ध मोर्चा काढला आहे. त्यांच्या विरुद्ध यापूर्वी देखील गंभीर गुन्हे दाखल आहेत. सेशन कोर्टात जमीन मिळाला नाही. त्यांना हायकोर्टात जमीन घ्यावा लागला आहे. **– पो.नि. जितेंद्र कोळी.**

महत्त्वाचे वृत्त...

ना टायर्ड हूँ, ना रिटायर्ड हूँ : शरद पवार

येवला : 'ना टायर्ड हूँ, ना रिटायर्ड हूँ', या अटलबिहारी वाजपेयींच्या ओळी उच्चारत शरद पवार यांनी अजित पवारांना टोला लगावला आहे. नाशिकमध्ये त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांना पत्रकारांनी अजित पवारांच्या भाषणावरुन प्रश्न विचारला. अजित पवार तुम्हाला रिटायर्ड व्हायला सांगत आहेत त्यावर काय सांगाल? असं विचारलं असता शरद पवार यांनी हे उत्तर दिलं आहे. वय होतं यात काही वाद नाही. पण तुम्ही प्रकृती चांगली ठेवली तर वय साथ देतं. त्यामुळे तो काही प्रश्न नाही. मोरारजी देसाई हे पंतप्रधान होते तेव्हा त्यांचं वय ८४ होतं. ते ज्या जोमाने काम करायचे तो अनुभव थक्क करणारा होता असंही पवार यांनी म्हटलं आहे.

तुम्ही परत या, आम्ही निघून जातो : आव्हाड

ठाणे : शरद पवार यांना या वयात त्रास देऊ नका, मी आणि जयंत पाटील बाजूला होतो, तुम्हाला राजकारणात दिसणार नाही, तुम्ही परत या, असे आवाहन राष्ट्रवादी नेते जितेंद्र आव्हाड यांनी अजित पवार गटाला केले आहे. येवले दौऱ्यावर निघालेले राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांचे राष्ट्रीय सरचिटणीस डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हाध्यक्ष सुहास देसाई यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी ढोल ताशे आणि फटाक्यांच्या गजरात जोरदार स्वागत केले. त्यावेळी आव्हाड यांनी पत्रकारांशी बोलताना प्रतिक्रिया दिली.

अजिदादांची अवस्था माझ्यासारखीच : मुख्यमंत्री

गडचिरोली : जेव्हा तुमच्यात क्षमता असते, पण वागणूक दुय्यम दर्जाची मिळते तेव्हा त्याचा अजित पवार होतो, आता अजितदादांची अवस्था माझ्यासारखीच झाली आहे, असे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नवनियुक्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भुमिकचे समर्थन केले. नुकत्याच घडलेल्या सत्तानाट्यानंतर शनिवारी गडचिरोली येथे सरकार आपल्या दारी या उपक्रमाकरिता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे पहिल्यांदाच एका व्यासपीठावर आले.

उध्दव ठाकरे दोन दिवस विदर्भ दौऱ्यावर

नागपूर : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील फुटीमुळे राज्यात निर्माण झालेल्या राजकीय उलथापालथीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे हे पक्षाचा पाया मजबूत करण्यासाठी रविवारपासून दोन दिवस विदर्भाच्या दौऱ्यावर येत आहेत. एक वर्षापूर्वी शिवसेनेत पडलेल्या फुटीनंतर पक्षाच्या कार्यकर्त्यांची दोन गटांत विभागणी झाली. आता राष्ट्रवादीत फूट पडली. यामुळे महाविकास आघाडीच्या अस्तित्वावरही प्रश्न उपस्थित केले जात आहे. या परिस्थितीत आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकींसाठी पक्षाची पुनर्बांधणी करण्यासाठी महाराष्ट्र दौरा करणार, असे ठाकरेंनी जाहीर केले होते.

राकाँचे माजी नगरसेवक पानसरेंची हत्या

पुणे : राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक मेहबुब पानसरे यांची कोयता आणि कुऱ्हाडीचे वार करुन हत्या करण्यात आली आहे. शुक्रवारी संध्याकाळी साडेपाच वाजता मेहबुब पानसरे यांच्यावर कोयता आणि कुऱ्हाडीने हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले. त्यानंतर त्यांना पुण्यातल्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारांदरम्यान त्यांचा मृत्यू झाला. मेहबुब पानसरे हे जेजुरीचे माजी नगरसेवक होते आणि प्रसिद्ध व्यापारी म्हणूनही त्यांचा लौकिक होता. जमिनीच्या वादातून वणेश प्रल्हाद परदेशी, किरण वणेश परदेशी, स्वामी वणेश परदेशी व इतर पाच जणांनी मेहबुब पानसरे व इतर दोघांवर कोयता, कुऱ्हाडीने हल्ला केला.

न्यायालयाच्या आदेशानुसारच पालिका निवडणुका

मुंबई : ग्रामपंचायती वगळता महापालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने 'जैसे थे'चा आदेश दिला आहे. यामुळेच सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतरच राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडतील, असे राज्य निवडणूक आयोगाने स्पष्ट केले. मतदार याद्यांबाबत राज्य निवडणूक आयोगाच्यावतीने ५ तारखेला अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली. १ जुलै रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदारसंघनिहाय याद्या सप्टेंबर ते ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या निवडणुकांमध्ये वापरल्या जातील, असा त्यात उल्लेख करण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाने 'जैसे थे'चा आदेश दिल्याने निवडणुकांची घोषणा करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे राज्याचे निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र काँग्रेसची १४ जुलैला दिल्लीत बैठक

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठोपाठ काँग्रेसमधील काही आमदार फुटून महायुतीच्या सोबत येणार असल्याची चर्चा सुरू असताना काँग्रेसने येत्या १४ जुलै २०२३ रोजी नवी दिल्लीत महाराष्ट्रातील नेत्यांची बैठक बोलावली आहे. या बैठकीत पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि नेते राहुल गांधी हे प्रदेश नेत्यांशी संवाद साधणार आहेत. राज्यातील महाविकास आघाडीचा घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादीतील फुटीच्या पार्श्वभूमीवर या बैठकीला महत्व आले आहे. पक्षातील एकजूट, आगामी निवडणुका तसेच विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपद आदी मुद्यांवर या बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे.

पिंपरीतील तीन टोळ्यांवर 'मोक्का'

पिंपरी : चिखली, सांगवी आणि तळेगाव एमआयडीसीतील तीन टोळ्यांवर मोक्काअंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मोक्का) कारवाई करण्याचे आदेश दिले. चिखलीतील टोळी प्रमुख करण रतन रोकडे (वय २५, रा. चिंतामणीनगर, चिखली) आणि त्याचे १२ साथीदार, सांगवीतील टोळी प्रमुख बाबा सैफन शेख,(वय २९, राजीव गांधीनगर, पिंपळे गुरव) त्याच्या टोळीतील इतर पाचजण आणि तळेगाव एमआयडीसीतील टोळी प्रमुख अनिल जगन जाधव (वय २३, रा. वराळे, ता. मावळ) याच्यासह सहाजणांविरोधात मोक्काची कारवाई करण्यात आली आहे.

वर्षाविहारासाठी गेलेल्या तरुणांचा मृत्यू

पुणे : मावळात मित्रांसोबत वर्षाविहारासाठी आलेला नगरमधील तरुण बुडाल्याचा घटना कुंडमाळ परिसरात घडली. पाण्यात बुडालेल्या तरुणाचा शोध घेण्यात आला. मात्र, त्याचा ठावठिकाणा लागला नाही. ओंकार बाळासाहेब गायकवाड (वय २४, मूळ रा. अहमदनगर) असे बुडालेल्या तरुणाचे नाव आहे. ओंकार आणि त्याचे मित्र मावळातील कुंडमाळ परिसरात वर्षाविहारासाठी आले होते. बंधाऱ्यावरुन ओंकार निघाला होता. पावसामुळे बंधारा निसरडा झाला आहे. पाय घसरुन ओंकार पाण्यात पडला. पाण्याचा वेग जास्त असल्याने तो वाहून गेला. मावळ वन्यजीव रक्षक बचाव पथकाने घटनास्थळी धाव घेतली. बचाव पथकाने शोधमोहीम राबविली. ओंकार सापडला नाही.

पवारांनी सर्वांनाच झोडपले

सर्व बंडखोरांचा पराभव करणार...

सुराज्य/नाशिक

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात अजित पवार यांच्या समर्थक आमदारांनी बंड करून पक्षात फूट पाडल्यानंतर पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांची नाशिक जिल्ह्यातील येवला विधानसभा मतदारसंघात सभा होत आहे. शरद पवार यांच्या राज्यव्यापी दौऱ्याची सुरुवात भुजबळ यांच्या येवला येथून होत असून या सभेसाठी नाशिकमध्ये पोहोचलेल्या पवारांनी सभेआधी पत्रकार परिषद घेत बंडखोर नेत्यांनी केलेल्या आरोपांवर जोरदार पलटवार केला आहे. तसेच आपल्या दौऱ्याला सुरुवात करण्यासाठी नाशिकचीच निवड का केली, यामागचं कारणही त्यांनी सांगितलं आहे.

'नाशिक हा जिल्हा नेहमीच काँग्रेसी विचारांचा राहिला आहे. आमच्या सर्वांचे गुरू आणि प्रेरणास्थान असलेल्या यशवंतराव चव्हाण यांनाही या जिल्ह्याने बिनविरोध संसदेत पाठवलं होतं. त्यामुळे नवीन कामाला सुरुवात करताना मी या जिल्ह्याची निवड केली,' असं शरद पवार यांनी म्हटलं आहे. तसंच आजची सभा मी टीका-टिपण्णी करण्यासाठी घेत नसल्याचंही पवारांनी स्पष्ट केलं आहे.

मुंबईत ५ जुलै रोजी घेतलेल्या मेळाव्यात अजित पवार यांनी पक्षातील नेते जितेंद्र आव्हाड यांच्यामुळे पक्षातील अनेक नेते पक्ष सोडून गेले, असा आरोप केला होता. यावर बोलताना शरद पवार यांनी अजित पवारांना टोला लगावला आहे. 'ज्या व्यक्तींने कधीही भाजपसोबत चला, अशी मागणी केली नाही, त्याने पक्षाचं नुकसान झालं की ज्यांनी भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतला त्यांनी पक्षाचं नुकसान केलं?' असा खरमरीत सवाल पवारांनी उपस्थित केला आहे.

आजची सभा ही टीका-टिपण्णी करण्यासाठी नसल्याचं शरद पवार यांनी सांगितलं असलं तरी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर बोलताना पवार यांनी छगन भुजबळ यांना केलेल्या मदतीची आठवण करून दिली आहे. 'शिवसेनेतून बाहेर पडलेल्या छगन भुजबळ यांचा मुंबईत पराभव झाला होता. मात्र ते विधानसभेत असावेत यासाठी मी येवला या आमच्या विचारांच्या मतदारसंघातील सहकाऱ्यांशी चर्चा करून भुजबळ यांना इथे आणलं. आता जे आमच्यापासून बाजूला गेले त्यांच्याबद्दल आम्ही काही ठरवणार नाही, लोक ठरवतील,' असं ते म्हणाले.

शरद पवार यांनी पक्षाची धुरा सुप्रिया सुळेंच्या हाती दिल्याचा आरोप नुकताच प्रफुल पटेल यांनी केला होता. त्यावर बोलताना शरद पवार म्हणाले की, 'राष्ट्रवादी पक्ष स्थापनेपासून अनेक वर्ष सत्तेत होता. मात्र अनेकदा संधी असूनही सुप्रियाला मी मंत्री केलं नाही. याउलट पटेल यांना केंद्रात कॅबिनेट मंत्रिपद दिलं. लोकसभेला पराभूत झाल्यानंतर राज्यसभेत संधी दिली'

दरम्यान, शनिवारी सकाळी ८ वाजता सिल्व्हर ओक या निवासस्थानावरून शरद पवार हे दौऱ्यावर निघाले आहेत. ठाणे, भिवंडी, पडघा, शहापूर, इगतपुरी या मार्गावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी ठिकठिकाणी त्यांचं जोरदार स्वागत केलं.

ओटीपी प्रकरणात सॉफ्टवेअर इंजिनिअरला अटक

सुराज्य/पुणे

पाकिस्तानी गुप्तहेर संघटनांच्या हस्तकांना ओटीपी (वन टाइम पासवर्ड) शेअर केल्याच्या घोटाळ्यात कथित सहभागाबद्दल ओडिशा पोलिसांच्या स्पेशल टास्क फोर्सने (एसटीएफ) पुण्यातून एका सॉफ्टवेअर इंजिनिअरला अटक केली आहे. अभिजित संजय जांबुरे असं संशयित तरुणाचं नाव आहे. तो मूळचा सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील आहे. तो पुण्यातील एका नामांकित आयटी कंपनीत कामाला होता. त्याला स्थानिक न्यायालयात हजर करून भुवनेश्वरला नेण्यात आले.

जांबुरे गुजरात येथील सरदार वल्लभभाई पटेल विद्यापीठातून सांख्यिकी विषयातील पदवीधर आहे. तो दोन पाकिस्तानच्या लष्करी गुप्तहेर संस्थेच्या अधिकाऱ्यांच्या २०१८ पासून संपर्कात होता. सिमकार्डद्वारे तयार केलेले ओटीपी सायबर गुन्हेगारांना त्याने विकल्याचा संशय आहे. पाकिस्तानातील गुप्तचर अधिकाऱ्यांना त्याने फेसबुक मेसेंजरद्वारे ओटीपी शेअर केले; तसेच तो व्हॉट्सअॅपद्वारे पाकिस्तानी आणि नायजेरियन नागरिकांच्या संपर्कात असल्याचे 'एसटीएफ'ने पत्रकात म्हटले आहे. पुणे न्यायालयातून तीन दिवसांची ट्रान्झिट रिमांड मिळाल्यानंतर त्याला ओडिशामधील भुवनेश्वर येथे नेण्यात आले आहे. 'एसटीएफ'ने या प्रकरणात यापूर्वी चार जणांना अटक केली आहे.

ओटीपी शेअर घोटाळ्यातील आरोपी एखाद्या व्यक्तींच्या नावावर ॲक्टिव्हेट न झालेले सिमकार्ड घेत असत. त्याद्वारे ओटीपी तयार करून डिजिटल वॉलेटला एक हजार ते ३० हजार रुपयांना विकत होते. अशा प्रकारे सायबर गुन्हेगारांना हजारो ओटीपी शेअर केल्याची माहिती तपासात मिळाली आहे.

लाचखोर भूमापकाला पकडले रंगेहाथ

साडेनऊ हजारांची लाच मागितल्याचे प्रकरण

छत्रपती संभाजीनगर : वडिलोपार्जित जमिनीची नियमानुसार मोजणी करून देण्यासाठी साडेनऊ हजार रुपये लाच घेणारा सिल्लोड येथील भूमापन कार्यालयातील भूमापक चंद्रशेखर राजाभाऊ अन्वीकर याला लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने गुरुवारी (६ जुलै रोजी) ताब्यात घेतले.

या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार यांच्या मूळ गावी असलेल्या वडिलोपार्जित जमिनीचे सातबाराप्रमाणे चंद्रशेखर अन्वीकर यांनी जमिनीची मोजणी केलेली होती. त्यानुसार मोजणीच्या हद्दखुणा मोजणी नक्कल तक्रादार यांना उपलब्ध करून देण्यासाठी अन्वीकर याने १५ हजार रुपये लाचेची मागणी केलेली होती. तक्रारदाराकडून त्याने पूर्वीच पाच हजार रुपयेही घेतलेले आहेत.

या प्रकरणात उर्वरित दहा हजारापैकी तडजोड करून त्याने साडेनऊ हजाराची मागणी केली होती. त्यामुळे तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीनुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे सिल्लोड येथील उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयाच्या बाहेर अजिंठा मार्गावर परशुराम चौकात साडेनऊ हजार रुपयांची लाच स्वीकारताना पथकाने रंगेहाथ पकडून ताब्यात घेतले.

टोमॅटो



सुराज्य/नाशिक

राज्यातील सत्ताकारण जोरात सुरू असतानाच सामान्य माणूस मात्र महागाईच्या आगीत होरपळून निघतो आहे. तीन आठवड्यांपासून टोमॅटोचे भावाने महागाईचा शिखर गाठल आहे. आजमितीला नाशिकच्या बाजारात टोमॅटोसाठी तब्बल १६० रुपये मोजावे लागत आहेत. तर कोथिंबीर जुडीसाठी थोडेथोडके नव्हे तर चांगले ४० रुपये मोजावे लागत आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले असून काही शेतकऱ्यांना मात्र दिलासा मिळाला आहे.

अनेक शहरांमध्ये 'दीडशे पार'

महाराष्ट्रासह विविध राज्यात सुरू असलेल्या पावसाचा फटका टोमॅटोसह इतर भाज्यांना बसला आहे. राज्यासह देशभरात टोमॅटोचे भाव गगनाला भिडले असून पाच आणि दहा रुपये किलोने मिळणारे टोमॅटो आज जवळपास १५० ते १६० रुपये किलो दराने मिळत आहेत.

यंदाच्या चालू वर्षी टोमॅटो उत्पादन येणाऱ्या बहुतांश शेतकऱ्यांनी अधिक प्रमाणात टोमॅटो लागवड केल्याने कृषी उत्पन्न बाजार समितीत टोमॅटोची मोठ्या प्रमाणात आवक वाढलेली होती. त्यामुळे टोमॅटोला उठाव नसल्याकारणाने प्रति किलोला दीड ते दोन रुपये भाव मिळत होते. प्रतिकिलोला एक दीड रुपया बाजारभाव शेतकऱ्यांना मिळत असल्याने जिल्ह्यातील अनेक बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांनी टोमॅटो रस्त्यावर फेकला होता. तर काही भागातील शेतकऱ्यांनी शेतात जनावरे सोडली होती. अनेक ठिकाणी दराबाबत आंदोलने देखील करण्यात आली होती. गेल्या काही दिवसांपासून टोमॅटो उत्पादन मोठ्या प्रमाणात घटल्याने टोमॅटो बाजार चांगलेच तेजीत आले आहेत.

नाशिक बाजार समितीत लिलाव प्रक्रियेत टोमॅटो प्रति किलो १२० रुपयांपासून ते १६० रुपये दराने विक्री होत आहे. तब्बल दीड ते दोन महिन्यानंतर टोमॅटो मालाला वर्षातील सर्वाधिक उच्चांकी बाजार मिळाल्याने टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांत आनंदाचे वातावरण पसरले आहे.

गुड न्यूज : एसी डब्यातून प्रवास करणाऱ्यांना २५ टक्के इतकी सवलत

सुराज्य/नवी दिल्ली

रेल्वेने प्रवास करणाऱ्या देशातील कोट्यवधी प्रवाशांसाठी आनंदाची बातमी आहे. अधिक दरामुळे जर तुम्ही रेल्वेच्या एसी डब्याचे तिकीट घेऊ शकत नसला तर आता अशी वेळ येणार नाही.

केंद्र सरकारने रेल्वेच्या एसी डब्याच्या तिकिटांचे दर कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. रेल्वे बोर्डाने शनिवारी या संदर्भातील एक आदेश दिला आहे. ज्यामुळे एसी चेअर कारवाल्या तिकीट दरात कपात होणार आहे.

रेल्वे बोर्डाने जाहीर केल्यानुसार प्रवाशांसाठी सवलत भाडे योजना सुरू केली आहे. रेल्वेतील जागांचा पूर्ण उपयोग करण्याच्या उद्देशाने रेल्वे मंत्रालयाने एसी सिटिंग गाड्यांच्या भाड्यात सवलत देणारी योजना सुरू करण्याचे ठरवले आहे. या संदर्भातील अधिकार प्रत्येक विभागाला देण्यात आले आहे. प्रवाशांच्या संख्येच्या आधारावर २५ टक्क्यांपर्यंत दर कमी होणार आहे.

रेल्वे बोर्डाच्या आदेशानुसार ही योजना एसी चेअर कार आणि सर्व एसी सिटिंग गाड्यांच्या एग्जिक्यूटिव्ह क्लेसेसला लागू होणार आहे. या गाड्यांच्या भाड्यात प्रवाशांच्या संख्येच्या आधारावर २५ टक्क्यांपर्यंत तिकीट दरात सवलत मिळणार आहे.

१९ हजारांहून अधिक जोडप्यांना 'सरकारी आहेर'

सुराज्य/पुणे : सन २०१८ ते २०२२ या काळात राज्यात आंतरजातीय विवाह केलेल्या १९ हजारांहून अधिक जोडप्यांना सरकारी आहेर देण्यात आला असून, एकूण ९७ कोटींचा निधी वितरित करण्यात आला. राज्यात समाजकल्याण विभागाच्यावतीने आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्यांना अर्थसहाय्य देण्यात येते.

या योजनेत केंद्र सरकारकडून ५० टक्के आणि राज्य सरकारकडून ५० टक्के निधी उपलब्ध करून दिला जातो. योजनेअंतर्गत प्रत्येक जोडप्याला ५० हजार रुपये याप्रमाणे अर्थसाहाय्य देण्यात येते. ही रक्कम पती-पत्नी यांच्या संयुक्त नावाने देण्यात येते.

दबक्या पावलांनी आला, प्रतिकार करताच पळाला

सुराज्य/कोल्हापूर

कोल्हापूर जिल्ह्यातल्या पन्हाळा इथल्या सज्जा कोटी इथं राहणाऱ्या डॉक्टर होळकर यांच्या घरी मध्यरात्री पुन्हा बिबट्याने हजेरी लावली. रात्री दीड वाजण्याच्या सुमारास या बिबट्याने घरात शिरून दोन कुत्र्यांवर हल्ला केला. मात्र, यातील एका कुत्र्याने प्रतिकार केल्याने आणि डॉक्टर होळकर यांनी घराची लाईट लावल्याने बिबट्या पळून गेला. मात्र, त्याच्या मागे लागलेल्या एका कुत्र्याचा बिबट्याने फडशा पाडला आहे. यापूर्वी देखील या बिबट्याने डॉक्टर होळकर यांच्या कुत्र्यावर चार वेळा हल्ला केला असल्याने पन्हाळा परिसरात या बिबट्याची दहशत प्रचंड प्रमाणात वाढली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा गडावरील सज्जा कोटी येथे डॉक्टर होळकर कुटुंबीय वास्तव्यास आहे. गेल्या काही दिवसांपासून या परिसरात मोठ्या प्रमाणात बिबट्याची दहशत वाढली असून रात्री दीडच्या सुमारास होळकर यांच्या बंगल्यात हा बिबट्या शिरला. होळकर यांच्या घरात असलेल्या डँगो नावाच्या कुत्र्यावर त्याने हल्ला केला. यावेळी डँगोने त्याचा प्रतिकार केल्यामुळे आणि डॉक्टर होळकर यांच्या कुटुंबीयांनी लाईट लावून बाहेर आल्यामुळे बिबट्या पळून गेला.

पोलिसांचा वचक बसण्यासाठी

गुंडांची काढली धिंड; 'वरात' किती सुरक्षित

सुराज्य/पुणे

शहरातील उच्चभ्रू आणि सुरक्षित समजल्या जाणाऱ्या सदाशिव पेठेत भरदिवसा तरुणीवर कोयत्याने झालेला जीवघेणा हल्ला, शहराच्या विविध भागांत वाहनांची तोडफोड, कोयत्याचा धाक दाखवून दुकानदारांना लुटण्याचे प्रकार, उपनगरांमध्ये कोयता गँगची वाढलेली दहशत आणि शहरातील महाविद्यालयांत कोयते फिरवणारे विद्यार्थी अशाप्रकारे शहरात फोफावलेल्या गुंडगिरीला चाप लावण्यासाठी पोलिसांनी त्यांची धिंड काढण्याची नामी शक्कल लढवली आहे. गुंडांवर वचक निर्माण व्हावा, यासाठी खुलेआम त्यांची 'वरात' काढण्यात येत असली तरी संबंधितांना रस्त्यावरून फिरवणे कितपत सुरक्षित आहे, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

शहरात 'कोयता गँग' नामक कोणतीही मोठी टोळी कार्यरत नसली, तरी शहराच्या विविध भागांत टोळक्यांनी कोयत्याचा वापर करून दहशत निर्माण केली आहे. वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे शहरातील कायदा आणि सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसही आता आक्रमक झाले असून गुंडांवर वचक बसावा, यासाठी विविध उपाय शोधण्यात येत आहेत.

धिंड काढल्याने जरब बसेल?

गुंडांना जरब बसावी, यासाठी त्यांची रस्त्यावरून धिंड काढण्यात येत आहे. तपासासाठी आरोपीला घटनास्थळी न्यावे लागते. त्या वेळी आरोपीला रस्त्यावर फिरवून लोकांचे मनोधैर्य वाढविण्याबरोबरच नागरिकांच्या मनात पोलिसांप्रति विश्वास निर्माण व्हावा, यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येत आहेत. मात्र, धिंड काढल्याने आरोपींच्या मानवाधिकारांचे उल्लंघन होण्याचीही भीती आहे. धिंड काढल्याने गुन्हेगारांवर खरोखरीच वचक बसणार का, असा प्रश्न असून, प्रसिद्धी मिळाल्याने आरोपींमध्ये गुन्हेगारी मानसिकता अधिक बळावण्याची शक्यता जास्त आहे.

सदाशिव पेठेत तरुणीवर हल्ला झाल्यानंतर तेथून जाणारे लोक घाबरून सैरावैरा पळत होते. काही तरुणांनी आरोपीला पकडल्यानंतर जमाव प्रक्षुब्ध झाला आणि आरोपीला मारण्यासाठी पुढे आला. तरुणांनी आरोपीला पकडून पोलिस चौकीत नेऊन बंदिस्त केल्याने जमावापासून त्याचे संरक्षण झाले. आरोपीवर कायदेशीर कारवाई व्हावी, यासाठी तरुणांनी प्रयत्न केल्याने झुंडबळीचा अनर्थ टळला.

पोलिसांनी काढलेली धिंड :

१) डिसेंबर २०२२ : आंबेगाव येथील सिंहगड विधी महाविद्यालय परिसरात कोयत्याने वार करून दोघांनी दहशत निर्माण केल्याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलिसांनी दोघांची धिंड काढली. २) जानेवारी २०२३ : तरुणाच्या खुनाचा कट पोलिसांच्या प्रसंगावधानतेमुळे उधळला. या आरोपींची कोंढवा पोलिसांनी धिंड काढली. ३) जुलै २०२३ : दरोड्याच्या तयारीतील टोळीला शिवाजीनगर आणि डेक्कन पोलिसांनी पकडले. कर्वे रस्त्यावरील कॉलेजमध्ये शिक्षण घेताना तिथे दहशत माजविणाऱ्या आरोपींची कॉलेजच्या आवारातून नुकतीच धिंड काढण्यात आली. ४) जुलै २०२३ : तीन महिन्यांपासून पोलिसांना गुंगारा देणारा टोळीचा म्होरक्या आणि 'मकोका'तील आरोपींची कोंढवा पोलिसांनी बेड्या ठोकून धिंड काढली. ५) जुलै २०२३ : नाना पेठेत किरकोळ कारणांवरून आणि वर्चस्व वादातून दहशत पसरविणाऱ्या टोळक्याची समर्थ पोलिसांनी धिंड काढली.

मराठी विद्यापीठाची स्थापना नाही

सुराज्य/मुंबई

जिल्ह्यातील रिद्धपूर येथे मराठी विद्यापीठाच्या स्थापनेची घोषणा यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आली.

विद्यापीठाचे स्वरूप निश्चित करण्यासाठी पंधरा दिवसांच्या आत तज्ज्ञांची समिती स्थापन करण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती, पण या घोषणेला चार महिन्यांचा कालावधी उलटूनदेखील अद्यापपर्यंत तज्ज्ञांची समिती स्थापन न केल्याबद्दल अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे माजी अध्यक्ष श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी आश्चर्य व्यक्त केले असून यासंदर्भात त्यांनी उपमुख्यमंत्री, तसेच उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांना चौथे स्मरणपत्र पाठविले आहे.

फडणवीसांना चौथे स्मरणपत्र

राजकीय घडामोडींवर मतदारराजा भडकला

उड्या मारणारे सामान्य माणसांचे काय भले करणार?

२०१९ विधानसभा निवडणुकीनंतर भाजपा-शिवसेनेच्या येऊ पाहणाऱ्या सत्तेवर पाणी पेरले गेले आणि भाजपाला बाजूला सारत शिवसेना-राष्ट्रवादी आणि काँग्रेसने विविध खलबते करुन तीन पक्षांचे सरकार स्थापन केले. आणि तेथून भाजपाचे कुरघोड्या करण्यास सुरुवात केली. त्याचाच परिणाम म्हणून ईनमिन अडीच वर्षाची सत्ता उपभोगल्यानंतर उध्दव ठाकरे सरकारला पायउतार व्हावे लागले. याला कारण ठरले एकनाथ शिंदे यांचे सर्वात मोठे बंड. या बंडामुळे उध्दव ठाकरे यांची शिवसेना पुरती खिळखिळी झाली. ठाकरेंच्या सेनेतील गळती तेव्हापासून आजपावेतो काय थांबता थांबेना. एकनाथ शिंदे हे गेल्या जूनमध्ये भाजपाला जाऊन मिळाले, आणि त्यांची मुख्यमंत्रीपद पदरात पाडून घेतले. शिंदे-फडणवीस सरकार एक वर्ष चालते न चालते तोच इकडे नुकतेच अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये बंड करुन काका खा. शरद पवार यांच्यापुढेच आव्हान उभे केले. कायदेशीरदृष्ट्या आपलाच गट कसा ग्राह्य आहे, यावर आता महिना-दोन महिने काथ्याकूट चालणार.

गेल्या चार-साडेचार वर्षांपासून राज्यात जो राजकीय खेळ आणि माकउडया सुरु आहेत. याला महाराष्ट्रातील पुरती जनता वैतागली आहे. सोशल मिडिया आणि प्रसारमाध्यमातून याशिवाय दुसऱ्या बातम्या नाहीत. रोज सकाळपासून कोण फुटला..., कोण कुणास जाऊन मिळाला... याशिवाय काही चर्चाच नाही. या सर्वांना जनतेच्या आणि राज्याच्या विकासासाठी विधानसभेत पाठविले आहे. पण दर अधिवेशनाला त्यांचा 'गोंधळात गोंधळ' सुरुच असतो. कार्यकर्त्यांच्या मेहनतीच्या बळावर आणि मतदानाचा पवित्र हक्क असणाऱ्या मतदारांच्या जोरावर हे महाभाग निवडून गेले आहेत. पण याचे काहीच सोयरसुतक नाही. निवडून येईपर्यंत कार्यकर्ता आणि मतदार आपला राजा म्हणणारे ही मंडळी निवडून आल्यावर मात्र 'मीच राजा' म्हणत मिरवताना आपणास दिसतात.

ज्या मतदारांनी त्यांना निवडून दिले, तो मतदाराजा म्हणतो तरी काय. महाराष्ट्रातील राजकारणात जी उलथापालथ होत आहे, त्यावर त्यांच्या भावना तरी नेमक्या काय, यावर त्यांचे जाणून घेण्याचा प्रयत्न 'दैनिक सुराज्य' टीमने केला.

आताच्या राजकारणी मंडळींमध्ये सुसंस्कृतपणा राहिला नाही, सोयीचे राजकारण सुरु झाले, सरकार प्रभावशाली बनेल, गलिच्छ राजकारण सुरु आहे, ... अशा लोकांना थारा द्यायला नको, जे घडते ते चांगले घडत आहे, ... यांना पायदळी तुडवले पाहिजे, हे तर भावना दुखावण्याचे कारस्थान, माकडउड्या मारत आहेत, स्वार्थासाठी कार्यकर्त्यांचा उपयोग, सर्वसामन्यांशी यांना देणेघेणे नाही, निवडणुकीत जागा दाखवू, आता नोटालाच मतदान करा, आता मतदारांनीच धडा शिकवावा, अशा बोलक्या आणि झोंबणाऱ्या प्रतिक्रिया सोलापूर शहर व जिल्ह्यातील मतदारांनी नोंदविलेल्या आहेत.

सुसंस्कृतपणा राहिला नाही

रोज एकमेकांवर कुरघोडी करणारी भाषणे करायची आपण कसे योग्य आहोत, हेच दाखविण्याचे काम सुरु आहे. राज्यातील नागरिक महागाईने वैतागले आहेत तर शेतकऱ्यानां वाऱ्यावर सोडले आहे. यांची संवेदनाशीलता संपले आहे . फक्त राजकीय स्वार्थ, मंत्रीपदे, रुसवे, फुगवे, दमदाटी, दबाव एवढेच शिल्लक राहिले यातून देशाची वाटोळे होत आहे. सुसंस्कृत कृतज्ञता राहिली नाही. सामान्य माणसाचे काय भले करणार तुम्ही एकदा मते देऊन मोकळे व्हा, मग आमचे मालक अशी एवढीच नागरिकांचे काम झाले आहे.

– डॉ. प्रा. राजेंद्र दास, कुर्डूवाडी



...अशा लोकांना थारा द्यायला नको होता

प्रस्थापित सत्तेशिवाय राहु शकत नाहीत हे सध्या दिसतेय परंतु भाजप सत्तेवर नसताना त्यांचे कोणी फुटले नाहीत. भाजपने घोटाळेबाजांना पक्षात घेण्याऐवजी त्यांना जेलमध्ये पाठवले पाहिजे व महाराष्ट्र स्वच्छ केला पाहिजे. खरे तर भाजपने सत्तेबाहेर राहूनच गेली अनेक वर्ष सत्तेत असणाऱ्या भ्रष्टाचार करणाऱ्यांना झटका देऊन वठणीवर आणायला पाहिजे होते. सर्वच आरोप असणाऱ्या लोकांचा ओढा भाजपकडे दिसतोय पण भाजपने अशा लोकांना थारा द्यायला नको होता.

– शिवराज पुकळे, कुर्डूवाडी

प्रत्येक नेत्याने आदर्श विचारसरणी जोपासावी

सर्वच राजकीय पक्षांची विचारसरणी किंवा जाहीरनामे देशाच्या हिताचे वाटतात त्यामुळे प्रत्येक पक्षातील नेत्यांनी आपापले जाहीरनामे किंवा विचारसरणी याला अनुसरून वागले तर राजकीय आणीबाणीची परिस्थिती निर्माण होणार नाही. देशातील राज्यातील प्रत्येक नेत्याचे कार्य आहे ते नाकारून चालणार नाही पण समाजात आपली प्रतिमा या सर्व नेत्यांनी जपणे गरजेचे आहे. प्रत्येक नेत्यांनी नैतिकता बाळगून आचार विचार जोपासला पाहिजे.

– पांडूरंग तुकाराम खंडागळे, हॉटेल व्यावसायिक,अकलूज

मतदाराजाची फसगत होतेयं

सध्याची राजकारणाची परिस्थिती बघता अस वाटतयं की. जनतेला वेड्यात काढले जात आहे. कार्यकर्त्यांना कोणता झेंडा घेऊ हाती?, अशा संभ्रम आहे. रडताना बाप गेला आणि बोंबलताना हात गेला, अशी परिस्थीती निर्माण झाली आहे. यामुळे लोकशाहीवरचा विश्वास उडत चालला आहे. देशात वारंवार होणाऱ्या पक्षांतरांना मर्यादा घालण्यासाठी पक्षांतर बंदी कायदा तयार करण्यात आला. मात्र त्यांचा वापर कठोरपणे केला पाहिजे अन्यथा हे राजकारणी मतदार राजाची अशी फसगत करत राहतील

– ॲड. मुणाल गोरे, सोलापूर

सोयीचे राजकारण सुरू झाले आहे.

सध्याची राजकीय परिस्थिती पाहता आंपण लोकशाहीत आहोत का? हाच प्रश्न पडला आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी जो तो आपल्या सोयीचे राजकारण करू लागला आहे. त्यामुळे सामान्य माणसाच्या मताला अजिबातच किंमत राहिली नाही. नैतिकता राहिली नाही. सर्वसामान्य नागरिकांनी कुणाचा आदर्श ठेवायचा हाच मोठा प्रश्न पडला आहे. 'मरावे परी कीर्तीरुपी उरावे' ही म्हण आताा इतिहास जमा होऊ लागली आहे व सर्वांचे ध्येय 'मरावे परी किती रूपये उरावे' पक्षनिष्ठा, ध्येय नैतिकता याचा आदर्श आता या पिढीने काय घ्यायचा ?.

– ह.भ.प. डॉ.जयंत करंदीकर, कुर्डूवाडी.

गलिच्छ राजकारण सुरु आहे

सध्या महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती पाहता कोणत्याही पक्षातील नेत्यांना जनतेचे काहीही घेणे देणे नाही फक्त आपली असणारी प्रचंड संपत्ती, चौकशीचा ससेमिरा टाळण्यासाठी इतर पक्षातील नतेमंडळी भाजपात प्रवेश करीत आहेत. चौकशीच्या फेऱ्यातून निसटण्यासाठी भाजपा हा एकमेव पर्याय सध्या दिसत आहे. महाराष्ट्रातील जनतेने अशया प्रकारचे राजकारण कधीच पाहीले नव्हते पण योगायोगाने या पाच वर्षात फार गलिच्छ राजकारण पाहवयास मिळाले.

– विक्रम सुळे, कुर्डूवाडी

आता मतदारांनीच धडा शिकवावा

सध्याचे राजकीय पदाधिकारी स्व-हितासाठी थोड्या वेळाने कोणत्या पक्षात जातील हे सांगता येत नाही. अलिकडील काळात स्वार्थासाठी राज्यात घरफोडीचे आणि स्वार्थी राजकारण सुरु झाले आहे. सर्वसामान्य जनतेकडे कुणाचेही लक्ष नाही. जोतो सत्तेसाठी आणि खुर्चीसाठी हापापले आहे. येणाऱ्या निवडणुकीत मतदारांनी अशा लोकांना धडा शिकविण्याची वेळ आली आहे.

– धर्मराज विभूते, नान्नज

मतदान करायचे की नाही?

आज देशात मोठ्या प्रमाणात आरजकता माजली आहे. महागाई वाढली आहे. पेट्रोल, गॅस दरवाढीमुळे सर्वसमान्य लोकांचे जगणे मुश्किल झाले आहे. मात्र ज्यांना आपण विश्वास ठेऊन मतदान केले. लोकप्रतिनिधी म्हणून निवडून दिले, ते आपल्या मतदारांचा विश्वास घात करत आपल्या फायद्यासाठी या पक्षातून दुसऱ्या पक्षात उडी मारत स्वार्थी राजकारण करत आहे. यापुढे मतदान करावे का नाही?, असा प्रश्न आमच्या सारख्या तरूण वर्गाला पडला आहे.

– पूजा लवटे, गृहिणी, सोलापूर

निवडणुकीवर परिणाम होणार नाही.

राज्यातील राजकीय घडामोडीमुळे राजकीय अस्थिरता निर्माण झाली आहे. यामुळे कुर्डूवाडी शहरातील राजकीय समीकरण बदलणार आहे. नगरसेवकासाठी बाशिंग बांधून असलेल्यामध्ये गोंधळ उडत आहे. गेले २५ वर्ष नगरपालिकेत सत्ता ठकरे गटाकडे होती. राज्यातील चालू राजकीय घडामोडीचा शहरातील स्थानिक राजकारणावर काही परिणाम होणार नाही. .

– डॉ.विलास मेहता, कुर्डूवाडी.



मतदारांना पायदळी तुडवले जात आहे

लोकशाही टिकवायची असेल तर सत्ताधारी पक्षाबरोबर विरोधीपक्ष मजबूत असायला हवा. ज्या मतावर पक्ष टिकून रहातात, त्या मतदारांचे बहुमूल्य मत ध्यानात न घेता मनमानी कारभार करून सगळे पक्ष स्वःताची घरे भरीत आहेत. महागाइ ने जनता होरपळते पण त्यावर मार्ग न काढता प्रत्येक जातीचा नेता खरेदी करून मतदारांना पायदळी तुडवले जाते.

– बाबासाहेब मच्छिंद्र कांबळे, वेळापूर ता. माळशिरस

आता नोटालाच मतदान करा

सत्ताधारी पक्ष विरोधकांना फोडण्यासाठी दबाव, आमिष किंवा भीती दाखवणे ही सत्ताधाऱ्याची चाल आहे. घाबरून, उद्या अडचणीत जाण्यापेक्षा पद मिळो अथवा न मिळो जाणे पसंद करत आहेत, पक्ष आणि पदाधिकारी पसंद नाही, असे समजून मतदारांनी राष्ट्रीय कर्तव्य म्हणून नोटाला मतदान करावे असे माझे मत आहे.

– विष्णू बंडगर,पाथरी

लोकशाही जिवंत आहे की नाही?

देशांमध्ये लोकशाही जिवंत आहे का ? असा प्रश्न आम्हाला पडला आहे. पूर्वी राजकारणी लोकांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून अनेक तरुण मंडळी वाटचाल करत असत मात्र आजच्या राजकारणी लोकांना पाहिल्यानंतर खरंच यांना नैतिकता राहिली आहे का?, असा प्रश्न पडला आहे. देशात महागाई, पेट्रोल दरवाढ, शिक्षणाचा खर्च वाढलेला असताना या गोष्टीकडे सोयीस्कर दुर्लक्ष करून स्वार्थी राजकारण करण्यात हे लोकप्रतिनिधी कोलंटउड्या मारत असल्यामुळे देशात लोकशाही जिवंत आहे का नाही?, असा प्रश्न पडतो.

– सारिका पवार, शिक्षिका, सोलापूर

... हे तर भावना दुखावण्याचे कारस्थान

या बदललेल्या घडामोडींचा विचार केला तर कार्यकर्ते पक्षनिष्ठा आणि नेता या दोन्ही वरील विश्वासाला तडा जाऊन राजकारणापासून अलिप्त राहण्याचा प्रयत्न करतील. असे चालू राहिले तर नवीन कार्यकर्ते तयार होणार नाहीत कारण नेता आणि पक्ष असेच पक्ष सोडून दुसऱ्या पक्षात जाऊन सामान्य जनतेच्या व कार्यकर्त्यांच्या भावना दुखवण्याचे काम राजकारणी लोक करत आहेत. हे सगळं थांबवायचं असेल तर लोकप्रतिनिधींसाठी नवा कायदा केला पाहिजे.

– संजय भाग्यवंत, बोरगाव, ता. माळशिरस

पूर्वीसारखी विकास कामे नाहीत

सोलापूर जिल्ह्यात विकास कामे होताना दिसत नाहीत. पूर्वी त्यांच्या काळात विकास कामे भरपूर होत होती. ती आता दिसत नाहीत त्यामुळे राज्यात काहीही घडले तरी सोलापूर जिल्ह्यात मात्र सर्वांनी मोहिते पाटील, यांना साथ देऊन त्यांची ताकद वाढवणे गरजेचे आहे.

– मंगेश रमेश डावरे, पटवर्धन कुरोली, ता.पंढरपूर



फोडाफोडीचे राजकारण चालणार नाही

सध्याचे राज्यात अराजकता माजली आहे. राजकारण्यांच्या स्वतःच्या स्वार्थासाठी पक्षबदलत आहेत. प्रत्येक पक्षात फोडाफोडी सुरू आहे. त्यामुळे भविष्यात विरोधक उरणार नाही आणि विरोधकच नसेल तर लोकशाही अस्ताव्यस्त झाल्याशिवाय राहणार नाही.

–दिनेश जाधव,सोलापूर

सरकार प्रभावशाली बनेल

महाराष्ट्रात भाजपाची निर्विवाद सत्ता यायला हवी होती परंतु दुर्दैवाने तसे घडले नाही मात्र आता राष्ट्रवादीचे नेते अजित दादा पवार यांनी सरकारला पाठिंबा दिल्याने खऱ्या अर्थाने आता सरकार प्रभावशाली बनले आहे. अजित पवार हे स्वतः शेतकरी असल्याने शेतकऱ्यांच्या समस्या ते निश्चित पणाने दूर करते यात शंका नाही, अजित पवारांच्या या निर्णयाने महाराष्ट्रातील एक फार मोठा बहूजन समाज सरकारच्या पाठीशी राहील आगामी काळात राष्ट्रवादी, भाजप शिवसेना सर्व निवडणुका जिंकणार...

– नितीन मोरे,शेतकरी,रा. दहिटणे



स्वार्थासाठी माकडउड्या...

सध्याचे राजकीय वातावरण गलिच्छ बनले असून राजकीय नेत्यावरचा विश्वास उडाला आहे. अलिकडील राजकारण्यांच्या स्वतःच्या स्वार्थासाठी माकडउड्या पहाव्या लागत आहेत. सामाजिक ध्येय धोरणे राबवून समाज व्यवस्थेला पुढे घेऊन जाणारा नेता आता उरला नाही. आपल्या मूळ विचारधारेला मोठा माती देऊन सत्तेसाठी काय पण करताना आजकालची नेते मंडळी दिसत आहेत त्यामुळे भविष्यात विरोधक उरणार नाही आणि विरोधकच नसेल तर लोकशाही अस्ताव्यस्त झाल्याशिवाय राहणार नाही.

– मच्छिंद्र पगारे, अकलूज

निवडणुकीत जागा दाखवू

महाराष्ट्राची राजकारणाची सध्याची परिस्थिती पाहता महाराष्ट्राच्या राजकारणात हे अतिशय गलिच्छ असे राजकारण चालू आहे. एक मतदार म्हणून आम्ही तुम्हाला निवडून दिले याचा अर्थ असा की एकमेकांनी स्वतःसाच्या स्वार्थासाठी एकत्र येत असाल तर आम्हाला येणाऱ्या निवडणुकीत जागा दाखवावी लागेल. मतदारांच्या मनात नसताना देखील शिवसेना-राष्ट्रवादीला एकत्र घेतले याचा अर्थ आपण मतदारांच्या मतदानाला किंमत या दोन्ही पक्षांनी ठेवली नाही. शिवसेना-राष्ट्रवादीला या दोघांनी मतदारांची किंमत कमी केली भविष्यात मतदार या दोन्ही पक्षांना जागा दाखवेल.

–सचिन साठे, मंद्रूप

मतदान करायचे की नाही?

आज देशात मोठ्या प्रमाणात आरजकता माजली आहे. महागाई वाढली आहे. पेट्रोल, गॅस दरवाढीमुळे सर्वसमान्य लोकांचे जगणे मुश्किल झाले आहे. मात्र ज्यांना आपण विश्वास ठेऊन मतदान केले. लोकप्रतिनिधी म्हणून निवडून दिले, ते आपल्या मतदारांचा विश्वास घात करत आपल्या फायद्यासाठी या पक्षातून दुसऱ्या पक्षात उडी मारत स्वार्थी राजकारण करत आहे. यापुढे मतदान करावे का नाही?, असा प्रश्न आमच्या सारख्या तरूण वर्गाला पडला आहे.

– पूजा लवटे, गृहिणी, सोलापूर

राज्यात नवे पर्व सुरु होईल

अजित पवारांनी सत्तेत सहभागी होण्याचा घेतलेला निर्णय हा महाराष्ट्राच्या हिताचा आणि शेतकरी प्रगतीचा आहे, उद्योग या माध्यमातून महाराष्ट्राच्या प्रगतीचे नवे पर्व सुरू झाले आहे अजित पवारांनी शरद पवार यांच्या संदर्भात केलेले बंड वाईट वाटत असले तरी आतून चांगले होण्याचा हा क्षण आहे. कारण अजित पवार हे दूरदृष्टीचे नेते आहेत भाजपा राष्ट्रीय पक्ष आणि राष्ट्रवादी प्रादेशिक पक्ष समन्वय घडलातर खूप चांगले होईल.

– मल्लिकार्जुन हुळ्ळे,युवा उद्योजक

आता नोटालाच मतदान करा

शिवसेना व राष्ट्रवादी या दोन्ही पक्ष भाजपकडे गेल्याने महाराष्ट्रातील मतदारांना वेडा काढण्याचं काम शिवसेना, राष्ट्रवादी या पक्षांनी केले आहे. कोणत्याही पक्षाची हात मिळवण्याची गरज भाजपला नव्हती. शिवसेना व राष्ट्रवादी पक्षांना फक्त स्वार्थासाठी भाजपकडे आले आहेत या दोन्ही पक्षांनी मतदारांचा विश्वासघात केला आहे. पुन्हा निवडणुका झाल्यानंतर शिवसेना व राष्ट्रवादी हे परत आपापल्या पद्धतीने सोयीचे राजकारण करून भाजपला सोडतील.

– आप्पासाहेब पाटील, लवंगी

फोडाफोडीचे राजकारण चालणार नाही

सध्याचे राज्यात अराजकता माजली आहे. राजकारण्यांच्या स्वतःच्या स्वार्थासाठी पक्षबदलत आहेत. प्रत्येक पक्षात फोडाफोडी सुरू आहे. त्यामुळे भविष्यात विरोधक उरणार नाही आणि विरोधकच नसेल तर लोकशाही अस्ताव्यस्त झाल्याशिवाय राहणार नाही.

–दिनेश जाधव,सोलापूर

जे घडत आहे, ते चांगलेच आहे

सध्याची राजकीय घडामोडी पाहता असे वाटते की राजकारण करत असताना बेरजेचे राजकारण बघावे लागते. आणि बहुमतला किंमत आहे. इतर पक्षात खूप घडामोडी झाल्या पण भाजप मधे कधी काही फुटाफूट झाली का. त्याचे उत्तर नाही असे आहे. धाडसी निर्णय घेण्यासाठी बहुमत असावे लागते. आणि म्हणून जे काही आज महाराष्ट्र मध्ये घडत आहे, ते चांगलेच आहे.

– स्वनील मदने, कुर्डूवाडी



स्वार्थासाठी कार्यकर्त्यांचा उपयोग

राजकीय चालू घडामोडी मध्ये जे बदल झाले आहेत. जे बदल सुरू आहेत. या घडामोडीमुळे जे जनतेचे लोकप्रतिनिधी आहेत त्यांना आपण पक्षाची एक निष्ठा म्हणून निवडून देतो. अशा परिस्थितीमध्ये विश्वास कोणावर ठेवावा हा मोठा प्रश्न जनतेसमोर व कार्यकर्त्यांसमोर पडलेला आहे. 'बा विठ्ठला कोणता झेंडा घेऊ हाती' म्हणायची वेळ या राजकारणी लोकांनी कार्यकर्ते यांच्यावर आणली आहे. स्वार्थासाठी कार्यकर्त्याचा उपयोग व स्वार्थासाठी राजकारण चालले आहे.

– रमेश जठार,नातेपुते, शेतकरी



गलिच्छ राजकारणामुळे गोंधळ...

सर्व सामान्य मतदार जरी परंपरागत मतदान करत असला तरी वैचारिक पातळीवर मतदान करणारे लोक सुद्धा या राजकीय निर्णय प्रक्रियेमुळे बुचकळ्यात पडला आहे. देशहितासाठी लढण्यापेक्षा स्वतःचे भ्रष्ट कर्तृत्व झाकण्यासाठी सत्तेच्या पाठीमागे लागलेला १ वर्ग तर, राजकीय उलथापालथ करुण आपणास हवी ती धेयधोरण राबविण्यासाठी प्रयत्नशील १ वर्ग राजकारणाची गलिच्छ पातळी गाठतोय अस नक्की वाटते.

– विलास पाटील,तांदूळवाडी,ता. माळशिरस

सर्वसामान्यांशी यांना देणेघेणे नाही

आजच्या या राजकीय नेत्यांनी सर्वसामान्याचे काही देणे घेणे नाही राज्यात एकीकडे अतिवृष्टी व दुष्काळ जन्य परिस्थिती अशी अवस्था आहे. राज्यात दिवसेंदिवस सुशिक्षित बेरोजगारी वाढत आहे, महागाईचा भस्मासुर वाढत आहे, अशा या गंभीर प्रश्नावर सरकार आणि राजकारणी मूग गिळून गप्प आहेत स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी तिन्ही पक्ष एकत्र आलेत ही सर्व परिस्थिती पाहता नक्कीच आपला महाराष्ट्र अधोगतीला जाईल यात काही शंका नाही. राज्यकर्त्यानो वेळीच सुधारा नाहीतर मायबाप जनता तुम्हाला सत्तेपासून खाली आणल्याशिवाय शिवाय सोडणार नाही.

– गजानन बिराजदार, भंडारकवठे

मतदारांना वेडात काढण्याचे काम

शिवसेना व राष्ट्रवादी या दोन्ही पक्ष भाजपकडे गेल्याने महाराष्ट्रातील मतदारांना वेडा काढण्याचं काम शिवसेना, राष्ट्रवादी या पक्षांनी केले आहे. कोणत्याही पक्षाची हात मिळवण्याची गरज भाजपला नव्हती. शिवसेना व राष्ट्रवादी पक्षांना फक्त स्वार्थासाठी भाजपकडे आले आहेत या दोन्ही पक्षांनी मतदारांचा विश्वासघात केला आहे. पुन्हा निवडणुका झाल्यानंतर शिवसेना व राष्ट्रवादी हे परत आपापल्या पद्धतीने सोयीचे राजकारण करून भाजपला सोडतील.

– आप्पासाहेब पाटील, लवंगी

राजकारणाची झाली खिचडी

आज कोणीही सत्तेशिवाय राहु शकत नाहीत हे दिसत आहे. गेल्या चार वर्षात राजकारणाची खिचडी झाली आहे. आता कोण सत्तेत आणि कोण विरोधात हेच कळत नाही. राज्यात मुख्यमंत्री आणि विधान परिषद विरोधी पक्षनेताही शिवसेनेचा, उपमुख्यमंत्री राष्ट्रवादीचा तर विधानसभा विरोधी पक्षनेताही राष्ट्रवादीचाच आणि सरकार मात्र भाजपाचे. अशी खिचडी झाली आहे. आता यापुढे राजकारण काय होईल सांगता येत नाही. जनतेला वेड्यात काढण्याचे प्रकार राजकारणी करत आहेत.

–सचिन कोकाटे,सोलापूर

गोरगरिबांची चेष्टा करु नका

राज्यामध्ये बेकारीचा मोठा कळस झाला आहे. बेकारांची मोठी संख्या आहे. अनेकांना नोकऱ्या नाहीत. भाजपाने निवडणुकीच्या वेळेस अनेकांच्या हाताला नोकरी देतो असे आश्वासन दिले होते. पावसावर अवलंबून असणारे शेतीचे नुकसान होत आहे. सरकारने आता तरी गोरगरिबांचे चेष्टा न करता गोरगरिबांना न्याय द्यावा एवढीच अपेक्षा.

– पुष्पा नागनाथ गुरव, निराळे वस्तील सोलापूर

जनता दूधखुळी नाही !

भाजपा सरकारकडून मोठ्या अपेक्षा होत्या परंतु सध्या सत्तेचे राजकारण सुरू आहे. सत्तेचा वापर हा सर्वसामान्य जनतेसाठी झाला पाहिजे सध्या राज्यात महागाई मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे हातावर पोटे भरणाऱ्या नागरिकांची मोठी समस्या निर्माण झाली आहे. अनेक सुशिक्षित बेरोजगारांना नोकऱ्या नाहीत. शेती करायचा म्हटलं तर शेतीला पाणी नाही, असे असताना राजकारणी मात्र खुर्चीशी खेळत आहेत. जनता एवढी दूधखुळी राहिली नाही हे सत्ताधाऱ्यांनी लक्षात ठेवावे.

– अनिल बरकडे, शिक्षक, सोलापूर